# प्रकरण—पहिले

## मराठी कादंबरी उदय आणि विकास

'कादंबरी' या साहित्य प्रकाराची पूर्वपीठिका

'कादंबरी' चे स्वरुप आणि व्याख्या

'ग्रामीण' कादंबरीचा उदय आणि वैशिष्ट्ये

BARR.
SHIVAJI UNIVERSITY

# प्रकरण पहिले

# मराठी कादंबरी—उदय आणि विकास

## प्रास्ताविक

नैसर्गिक सृष्टीचा आदि आणि अंत कोणास माहीत नसतो म्हणूनच मानवाला आपल्या मनाप्रमाणे जिचा आदी, मध्य आणि अंत घडवून आणता येईल अशी मानवी जीवनातूनच एक सलग काल्पनिक सृष्टी निर्माण करण्याची उत्कंठा लागते. त्यातूनच कथा कादंबऱ्यांचा जन्म होतो. कादंबरीच्या किंबहुना साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेबाबतीत कै.वि.का.राजवाडे यांचे मत विचारात घेगे योग्य ठरेल. मराठी साहित्यातील एक समृध्द दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्‍व होय. लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून विविध विषय हाताळले. तत्कालीन समाज जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. त्या काळी सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या लाटा उसळल्या त्या लाटांचे चित्रण केले. त्यातूनच मराठी कादंबरीचे विश्‍व विस्तारले. सदाशिव पेठी वातावरणातून कादंबरी बाहेर पडली अन् शे सव्वाशे वर्षात ती खेडेगावातील शेतमजुरांच्या गोठयापर्यंत गेली. तिचे हे बदलते विश्‍व खरोखरीच मनाला भुरळ घालणारे ठरले आहे. 'कादंबरी' हा आधुनिक काळात उदयाला आलेला प्रकार मानला असला तरी त्याची पाळेमुळे प्राचीन वाङ्मयात सापडतात. कादंबरी या वाङ्मयाचा विकास मात्र पाश्‍चात्य देशामध्ये झाला. १८ व्या शतकात तिचे रुप उत्क्रांत झाले. समाजपरिवर्तन जसजसे होत गेले तसा काळही बदलू लागला. माणसांच्या विचारांमध्ये परिवर्तन होत गेले. या साऱ्यांचा परिणाम सर्व साहित्य प्रकारावर झाला. तो कादंबरीवरही झाला. जसा काळ बदलला तशी कादंबरीही बदलत गेली. काळ परिवर्तनाबरोबरच कादंबरीचे रुपही बदलत गेले. कादंबरी वाङ्मयाचा जसजसा विकास होत गेला. तसतसे नवे प्रवाह निर्माण होत गेले. पौराणिक, सामाजिक, चरित्रात्मक, ऐतिहासिक, राजकीय त्याचबरोबर दलित आणि ग्रामीण हे प्रमुख साहित्यप्रवाह निर्माण झाले. आजची कादंबरी विविध

प्रवाहांनी समृध्द अशी झाली. मराठी कादंबरी वाङ्मयाचे दालन एक समृध्द दालन म्हणून नावारुपास आलेले आहे.

## 'कादंबरी' या साहित्य प्रकाराची पूर्वपीठिका

मराठी साहित्यात कादंबरी वैपुल्याने लिहिली गेली असली तरी तिची समीक्षा मात्र झालेली दिसत नाही. कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरुपाने येणे अपरिहार्य ठरते. ''कादंबरी'' हा शब्द इंग्रजीतील NOVEL या शब्दावरुन आलेला आहे. NOVEL ही संज्ञा मूळ लॅटिन ''नॉव्हस'' म्हणजे नावीन्यपूर्ण आणि त्यांच्या ''नॉव्हेला (NOVELLA) या इटालियन रुपावरुन इंग्रजीत आली'' [१] Novel या शब्दाला कादंबरी असे मराठीत नाव देताना त्यांच्यासमोर ''बाणाची कादंबरी'' होती व असावी असे वाटते. कारण का.बा.मराठे यांनी ''कादंबरीस'' नावल असे संबोधून नवलपूर्ण कथा ती नावल असे सांगितले होते. अलीकडच्या काळात कादंबरी पूर्णपणे बदलली आहे. '' कादंबरीतून जे रंजन, अद्भुतता पूर्वी व्यक्त होत होती त्याला आता इंग्रजीत Romance असे म्हणतात. Romance आणि Novel यामधील भेद सांगताना क्लारा रीव्ह म्हणते, ''कादंबरी हे वास्तव जीवनाचे रीतिरिवाजाचे व आपल्या काळाचे एक चित्र असते. अद्भुतरम्य कादंबरी Romance जे कधीही घडले नाही व घडण्याची श्क्यता नाही. त्याचे भव्यदिव्य भाषेत वर्णन करीत असते." [२]

मराठी कादंबरीकारांनी सुरुवातीला जी कादंबरी लिहिली ती इंग्रजीच्या धर्तीची कादंबरी होती. सुरुवातीला 'यात्रिकक्रमण' नावाचे भाषांतर हरि केशवजींनी केले. ही घटनाच मुळी मराठी कादंबरीचे इंग्रजी कादंबरीशी असणारे नाते स्पष्ट करणारी आहे. तत्कालीन राजकीय घडामोडी आणि इंग्रजांचा संस्कृति

संपर्क यामुळे मराठी कादंबरीने आपली प्राचीन गदयाची परंपरा नाकारुन इंग्रजी वळणाची कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. 'यमुना पर्यटन (१८५७) सारखी कादंबरी लिहूनही मराठीत मुक्तामाला (१८६३) प्रवृत्तीने बाळसे धरले. यात्रिकक्रमण (पिल्ग्रिम्स प्रोग्रेसचे) भाषांतर सारखी भाषांतरे झाली. याच भूमिकेतून तत्कालीन समीक्षकांनी यमुना पर्यटन चे महत्त्व नाकारले. 'मुक्तामाला' मराठीतील पहिल्या कादंबरीचे स्थान देणारे बापट गोडबोले म्हणतात, ''कथा व कादंबरी यात काही भिन्नता आम्ही मानतो. कारण कादंबरीचे व्यवच्छेदक असे काही घटक ''यमुनापर्यटनांत'' सापडत नाहीत. ''कादंबरीचा आकार ही साधारण मोठया गोष्टी एवढा आहे. म्हणून य कृतीस रामोजी गणोजी संप्रदायातच घालणे अधिक योग्य आहे. एवढेच नव्हे तर त्यांची कादंबरी विषय धारणा देखील कला वादयांची बूज राखणारी आहे.''[३] ते म्हणतात ''सत्य सृष्टींच्या आधारे काल्पनिक प्रति सृष्टी निर्माण करुन काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रुपाने वर्णन करुन व कलानंदाची प्राप्ती करवून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गदय वाङ्मय विभाग.''[४] अशा कल्पना रुजविल्या गेल्यामुळे मराठीत काल्पनिक कादंबरीच महत्त्वपूर्ण ठरु लागली.

एकंदरीत सुरुवातीच्या कादंबरीच्या संकल्पना अर्थस्फुट स्वरुपाच्याच होत्या. त्यामुळे तत्कालीन कादंबरीकार सामाजिक संदर्भ वगळून व्यक्ती भोवतीच फिरणारी कृत्रिम कथानके निर्माण करण्यात गुंतले दैनंदिन जीवनापासून पळ काढणे, स्वप्नात रमणे, अद्‌भुतरम्य वातावरण निर्मिती करणे यातच सुरुवातीची कादंबरी गुरफटली 'मुक्तामाला' 'मंजुघोषा' सारख्या सुरुवातीच्या कादंबऱ्यांमधून संस्कृत मधील आर्ष काव्यांच्या वर्णन शैलींचा संस्कार उचललेला दिसून येतो. याचबरोबर पंडिती काव्याची लोकप्रियता ही या कादंबरी कारांनी उचलली पण आकृतिबंध मात्र इंग्रजी वळणाचा आहे. मराठीतील प्राचीन कथनात्म गदय परंपरेकडे पद्‌मनजी, हरिभाऊ यांनीही दुर्लक्ष

केले. यामुळे मराठी कादंबरीने संस्कृतचा संस्कार पचवून इंग्रजी धर्तीचा आकृतिबंध स्वीकारला. भालचंद्र नेमाडे म्हणतात,'' लीळा चरित्र, स्मृतिस्थळ, बखरी, महिपती कृत चरित्रे हे रचना प्रकार कादंबरीशी जुळणारेच आहेत. परंतु आपल्या कादंबरीकारांनी अनुकरणाने रुढ केली तीच कादंबरी असा अंध विचार पुढे येऊन तीन पिढया त्यातच गेल्या.''[५] परिणामत: मराठी कादंबरी कारांसमोर जी इंग्रजी कादंबरी आली ती रंजनप्रधान असल्याने मराठीत मुक्तामाला पासून खांडेकर, फडक्यांच्या कादंबऱ्या आणि र.वा.दिघे, श्री.ना.पेंडसे यांच्या ग्रामीण, प्रादेशिक कादंबऱ्या रंजनाच्या वृत्तीनेच लिहिल्या गेल्या. 'मोचनगड' च्या रुपाने ऐतिहासिक कादंबरी मराठीत अवतीर्ण झाली. पण या प्रवृत्तीच्या कादंबऱ्यांमधूनही बोधवादी भूमिकेतून रंजनच केले जाऊ लागले. यमुनापर्यटन ने निर्माण केलेली समाज वास्तवाधिष्ठित कादंबरीची परंपरा जरी पुढे चालत आली असली तरी रंजनाच्या या प्रवृत्तीमुळे 'रणांगण' (१९३९) 'बळी' (१९५०) सारख्या कादंबऱ्यांची परंपरा निर्माण होऊ शकली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कादंबरीचे आशय द्रव्य मराठी असले तरी अविष्कार रुप मात्र इंग्रजीच राहिले. स्थूलमानाने असे म्हणता येईल की सुरुवातीच्या कादंबरीने वाचकांची अभिरुची जोपासण्याचे कार्य केले आहे.

कादंबरी सभोवतालच्या जीवनातील घटना घटकातून आकारास येत असते. कादंबरी जीवनाचा शोध तर घेत असतेच पण त्याचबरोबर आत्म्याचाही शोध घेत असते. कादंबरी ही काही घटना तसेच पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा शोध घेत असते. कुसुमावती देशपांडे यांच्या मते,''पार्थिव संसाराविषयी आस्था ही कादंबरीची वृत्ती. जीवनाचे काने कोपरे चौकसपणे धुंडाळणे तत्त्व दर्शित्वाचा किंवा अद्‌भूताचा मार्ग धरुन मूलत: मानवी प्रश्नाचा विचार करणे हा कादंबरीचा दृष्टिकोन जीवनविषयक अनुभव वा कल्पना या कादंबरीचा मूळ आधार किंवा तिची मुख्य सामग्री ही वृत्ती हा दृष्टिकोन हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रांच्या व एक विस्तृत आकर्षक

कथानकाच्याद्वारे व्यक्त करणे ही कादंबरीची पध्दती''[६] कादंबरीच्या स्वरुपाविषयी मानवेंद्रनाथ बंडोपाध्याय लिहितात,

"It is both biography and chronicle biography. Because, it aims at depicting the life of one or more individuals and chronicle, Because, these individuals are the creation of particular age and society." [७]

अशाप्रकारे कादंबरी हा सामाजिक व ऐतिहासिक परिमाणांनी मुक्त अशा विशिष्ट कालवकाशातील विशिष्ट व्यक्तित्त्वांचा इतिहास ठरतो. किंवा असेही म्हणता येईल की, कादंबरीकार याही पलीकडे असलेले एक अंतर्बाहय सुसंगत असे विश्व कादंबरीत उभे करीत असतो. कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते. असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशयरुपाने येणे अपरिहार्य ठरते. कादंबरीत सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. समाजात राहूनच व्यक्ती आपल्या दर्शन बिंदूतून सामाजिक वास्तवाचा वेध घेत असते. प्रत्येक कादंबरी ही स्वतंत्रपणे अवतरत असते. नवी कादंबरी जुने तंत्र स्विकारील असे नाही. पारंपारिक रचनातंत्रातील काही परंपरा स्वीकारुन नवीन मानदंड निर्माण करते. याविषयी रवींद्र ठाकूर लिहितात,'' प्रत्येक कादंबरी ही आपला स्वतंत्र असा घाट घेऊनच अवतरते याचा अर्थ कादंबरी हा वाङ्मय प्रकार कादंबरीची रचनाविषयक परंपरा हेतुत: अनुसरीत नाही. असा नसून नव्या कादंबरीला पारंपारिक रचनाविषयक तंत्र आपल्या नव्या आशय द्रव्याच्या अभिव्यक्तिसाठी सुयोग्य वाटेलच असे नाही.''[८] कादंबरीचे शाश्वत असे घटक तिच्यातच असतात परंतु पारंपारिक रचना तंत्रातील घटकांचा सांकेतिकपणे स्वीकार न करता परंपरा पचवून नवीन कादंबरी निर्मितीचे नवे मानदंड निर्माण करते.

सारांश, साहित्य विश्वातील प्रधान साहित्य प्रकार म्हणून ओळखला जाणारा 'कादंबरी' हा वाङ्मय प्रकार आधुनिक काळात उदयाला आला आहे. असे मानले जात असले तरी कादंबरीचे बीज हे प्राचीन ग्रंथात सापडले आहे.

'कथेचे दीर्घरुप म्हणजे कादंबरी' अशी व्याख्या रुढ होत गेली. १८२९ मध्ये, प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' या ग्रंथांत 'कादंबरी' या शब्दाचे अर्थ देताना 'एक कल्पित कथा' असा एक अर्थ दिला आहे. प्रा. सौ.कुसुमावती देशपांडे यांच्या मते,''एका विशिष्ट तऱ्हेच्या कल्पित कथेला कादंबरी हे नाव मराठीमध्ये बऱ्याच आधीपासून रुढ असावे.''[९] याचा अर्थ मराठी कादंबरीचा इतिहास फार जुना आहे.

## मराठी कादंबरी :—

१८७४ पासून मराठी साहित्यक्षेत्रात नवे मन्वन्तर अवतरले निबंधास विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी, कवितेस केशवसुतांनी, नाटकास आण्णासाहेब किर्लोस्करांनी आणि कादंबरीस हरिभाऊंनी नवे रुप व नवा अर्थ दिला. पेशवेकाळाचा अंत होऊन इंग्रज राजवट सुरु झाली. इंग्रज सरकारने एक क्रांतीच घडवून आणली. आपल्या देशात इंग्रजांनी शिक्षणाचा प्रसार झपाटयाने सुरु केला. शिक्षणाचा पाया भक्कम केला. शिक्षणामुळे वैचारिक क्रांती घडून आली. मुद्रणाची सोय उपलब्ध करुन दिली. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचक निर्माण होत गेले. सुशिक्षित वर्गाला वाचनाची आवड निर्माण झाली. इंग्रजी भाषेतील वाङ्मय अनुवादित होऊन मराठीमध्ये येऊ लागले. इंग्रजी शिवाय अरबी, हिंदी, बंगाली भाषेतील ही अनुवाद मराठीत प्रसिध्द होऊ लागले. त्यातूनच मराठी कादंबरीचा उदय झाला.

मराठी कादंबरीच्या उदयापासून मराठी कादंबरी ही विविध टप्प्यातून आपला प्रवास करीत आली आहे. कादंबरीचा विकास जसजसा होत गेला. तसतसे नवनवे प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहांना बरोबर घेऊनच मराठी कादंबरी विश्व चढउताराने विस्तारत गेले. मराठी कादंबरीचा अभ्यास करताना कालखंडानुसार विचार करावयाचा आहे.

## १. इ.स. १८०० ते १८७४ मधील प्रारंभिक कादंबरीः—

मराठी कादंबरी वाङ्मयाचा पाया 'हरिकेशवजी पाठारे' यांनी 'यात्रिकक्रमण' या भाषांतरित कादंबरीने रचला 'बनियनच्या' 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर इ.स. १८४१ मध्ये केले. येथूनच मराठी कादंबरीचा प्रवाह वहात राहिला आहे. तत्कालीन काळातील मराठी कादंबरी बाल्यावस्थेत होती. एक म्हणजे भाषांतरीत कादंबरीची निर्मिती झाली. आणि दुसरे म्हणजे महाराष्ट्राची परिस्थिती अभिरुचीच्या दृष्टीने अनुकूल झाली होती. इ.स १८०० ते १८७४ या कालखंडात ' कादंबरी' या वाङ्मयाचा पाया रचला गेला. हे निश्चितच मान्य करावे लागेल.

मराठी वाङ्मयातील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून 'बाबापद्मनजी' यांनी लिहिलेल्या 'यमुनापर्यटन' (१८५७) या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. (१८७१) मध्ये लिहिली गेलेली 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी मानली जाते. ही कादंबरी सर वाल्टर स्कॉट आणि अलेक्झांडर डयूमा यांच्या प्रभावातून निर्माण झाली. 'नारायणराव आणि गोदावरी', शिरस्तेदार या कादंबऱ्यांनी हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीसाठी योग्य भूमी निर्माण केली असे म्हणता येईल. विष्णू पटवर्धनांनी 'हंबीरराव आणि पुतळाबाई (१८७३) ही कादंबरी १८५७ च्या बंडाशी निगडीत असणारी अशी लिहिली आहे. तिसरी ऐतिहासिक कादंबरी श.मो.रानडे यांची 'शिलादित्य (१८८४) ही कादंबरी आंध्र प्रदेशातील घटनांवर आधारलेली आहे.

ऐतिहासिक कादंबऱ्या निर्मितीबरोबरच काही पौराणिक बखरी निर्माण होऊन कादंबरी वाङ्मयाला काही प्रमाणात हातभार लागलेला दिसून येनो. इ.स. १८४५ मध्ये 'बकासुराची बखर' इ.स. १८५४ मध्ये 'श्रीमद्भागवत गीताची' 'संक्षिप्त बखर' इ.स. १८६१ मध्ये 'लव्हकुंशाची बखर' अशा काही बखरीमधून इतिहास प्रकट झाला आणि कादंबरी वाङ्मय विस्तारु लागले. वस्तुस्थितीचे

दर्शन घडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या कादंबरीने अद्‌भूत रम्यतेचे रुप धारण करुन एक परंपरा निर्माण केली आहे.

पहिली अद्‌भूतरम्य कादंबरी म्हणून 'लक्ष्मणशास्त्री हळबे' यांची 'मुक्तमाला' (१८६१) या अद्‌भूतरम्य कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. मुक्तामालेला प्रसिध्दी मिळताच हळबे यांची दुसरी कादंबरी 'रत्नप्रभा' (१८७८) मध्ये, प्रसिध्द झाली. मुक्तामालेनंतरची लोकप्रिय कादंबरी म्हणून ना.स. रिसबूड यांची 'मंजुघोषा' (१८६६) या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. सामाजिक व कौटुंबिक या पातळयांवर आधारलेली ही कादंबरी लोकप्रिय होती. या कादंबरीच्या यशानंतर रिसबूड यांनी 'वसंत कोकिळा' कादंबरीची निर्मिती केली. त्यांची ही अपूर्ण कादंबरी त्यांच्या बंधूने पूर्ण केली. वामन कृष्ण देशमुख यांनी 'सुहास्यवंदना' (१८७०) ही कादंबरी लिहिली. रामचंद्र आबाजी राजे यांची 'विलासिनी' (१८७१) ही मुक्तामालेच्या कथानकाशी मिळती—जुळती असणारी कादंबरी निर्माण केली. अद्‌भूतरम्य कादंबऱ्यांविषयी का.बा.मराठे या समीक्षकांनी 'नावल व नाटक' या निबंधात कादंबऱ्यातील दोष दाखवून 'नावलाची कीड' वाढल्याची तक्रार केली. काही कादंबरीकारांनी अद्‌भूतरम्य कादंबऱ्या निर्माण केल्या. साळुबाई तांबवेकर यांची शृंगाराने नटलेली 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७३) ही प्रसिध्द झाली. पांडुरंग पारखीशास्त्री यांनी 'मित्रछंद' ही अद्‌भूतरम्यतेबरोबर सुसंबध्द आणि बांधेसूद अशी कादंबरी निर्माण केली. वासुदेव रामचंद्र मोहोनी यांची 'पीयूषभाषिणी' व मदिरामंजिरी (१८८३) व्य.आ.परब यांची 'क्लेशविमोचन (१८८४) ग.ना.गागण यांची 'मंजुळा' (१८८५) अ.के.दप्तरदार याची 'राजपुत्र राजहंस' (१८८५) बाबा गोखले यांची 'राजा मदन' अशा 'अद्‌भूतरम्य' कादंबऱ्यांना समीक्षकांच्या दृष्टीने महत्त्व नसले तरी वाचक वर्गात अत्यंत लोकप्रिय झाल्या होत्या. याच काळात पहिली सामाजिक कादंबरी म्हणून बाबा पद्‌मनजी यांच्या 'यमुनापर्यटन (१८५७) या कादंबरीचा उल्लेख केला जातो. दुसरी सामाजिक कादंबरी विनायक दामले याची 'अवलिया' ही कादंबरी

होय. या कादंबरीतून समाजातील कौटुंबिक प्रश्नांवर त्यांनी विचार मंथन केलेले आहे. हरिभाऊंची 'मधली स्थिती' (१८८५) प्रसिध्द होईपर्यंत मराठी कादंबरीतील वास्तव समाजजीवनचित्र कोणत्याही कादंबरीने रेखाटलेले दिसून येत नाही. सामाजिक, ऐतिहासिक तसेच अद्भूतरम्यता या प्रकारातील काही कादंबऱ्यांचा अपवाद सोडता सर्वच कादंबऱ्या नीती बोधपर होत्या हे मान्य करावे लागेल. १८००–१८७४ या कालखंडातील निर्माण झालेल्या कादंबरीने मराठी कादंबरी वाङ्मयाच्या प्रवाहास गती दिली आहे. ही गोष्ट नाकारता येत नाही.

## २. इ.स. १८७४ –१९२० या कालखंडातील नवनिर्मित कादंबरी वाङ्मय

इ.स. १८७४ ते १९२० हा कालखंड कादंबरी वाङ्मयाच्य दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. या कालखंडात नवविचारांचे अनेक कादंबरीकार उदयास आले. कादंबरीने साहित्य विश्वात स्वत:चे अस्तित्व निर्माण केले. वाङ्मय प्रकारात आमुलाग्र परिवर्तन झाले. सामाजिक जीवनात निर्माण झालेल्या नव्या जागृतीचे हे सांस्कृतिक फलित होय. या कालखंडामध्ये हरिभाऊ नारायण आपटे, वा.म.जोशी., सहकारीकृष्ण, नाथमाधव आणि ना.ह.आपटे अशा अनेक कादंबरीकारांनी या कालखंडाची धुरा अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळलेली दिसून येते. कादंबरी विविधांगी रुपाने रुजली आणि तिचा विकास होत गेला.

या कालखंडातील पहिले प्रमुख कादंबरीकार म्हणून 'हरिभाऊ आपटे' यांचा उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते. समाजाचे निरीक्षण तसेच आकलन करुन कादंबरीत वास्तव समाजाचे चित्र रेखाटले याचा अर्थ हरिभाऊंनीच कादंबरीचा पाया घातला आहे असे म्हणावे लागेल हरिभाऊंची प्रारंभिक कादंबरी 'मधली स्थिती' (इ.स. १८८५) ही भाषांतरीत स्वरुपाची कादंबरी आहे. रेनॉल्डसच्या 'My Steries Of Old London' या कादंबरीचे भाषांतर करुन 'मधली स्थिती' असे मराठी नामांतर केले आहे. ह.ना.आपटे यांनी सामाजिक, ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण करुन समाजामध्ये परिवर्तन घडविले आहे. हरिभाऊ आपटे यांनी

सामाजिक कादंबऱ्यातून वास्तव चित्र रेखाटले आहे. 'गणपतराव' (१८७७—८८), 'पण लक्षात कोण घेतो' (इ.स.१८९७), यशवंतराव खरे (१८९२—९५), 'मी' (१८९३—९५), 'भयंकर दिव्य' (१९०३) 'मायेचा बाजार' (१९१०—१९१२), 'कर्मयोग' (१९१३—१७), 'जग कसे आहे' या सर्व सामाजिक कादंबऱ्यांतून सामाजिक विचार नितिमत्ता बोधवादी विचार देण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक कादंबऱ्याशिवाय आपटयांनी ऐतिहासिक कादंबऱ्याही निर्माण केल्या आहेत. 'उष:काल' (१८९५—९७), 'म्हैसूरचा वाघ' (१८९०—९१), 'रुपनगरची राजकन्या' (१९००—१९०२), 'गड आला पण सिंह गेला'(१९०३), 'चंद्रगुप्त' (१९०२—१९०४), 'सूर्योदय' (१९०५—१९०८), 'मध्यान्ह' (१९०६—१९०८) 'सूर्यग्रहण' (१९०८—१९०९. अपूर्ण कादंबरी), 'कालकुट्ट' (१९०९—१९११ अपूर्ण कादंबरी), 'वज्राघात (१९१३—१९१५) इ. कादंबरीतून शिवकालीन रजपुतांचा इतिहास भारताचा प्राचीन इतिहास सांगितला आहे.

वा.म.जोशी यांनी लिहिलेल्या 'रागिणी' च्या (१९१५) रुपाने मराठी कादंबरीने विकासाचा पुढचा टप्पा गाठला. वा.म.जोशी यांनी मराठी कादंबरीला तात्विकतेचे परिमाण दिले. त्यांचा कादंबऱ्यांतून जीवनापेक्षा जीवनाविषयीचे विश्लेषण अधिक असते. अशी टीका केली जात असली तरी, त्यांनी हाताळलेल्या सामाजिक प्रश्नांनी मराठी कादंबरीला वैचारिकतेची जोड दिली हे नाकारता येणार नाही. 'नलिनी' (१९१९) 'आश्रमहारिणी' या कादंबऱ्यातून वेगवेगळया स्त्री स्वभावाचे चित्रण केले आहे. 'सुशिलेचा देव' (१९३०) 'इंदू काळे सरला भोळे (१९३५) या कादंबऱ्यातून धाडसी स्त्रियांचे चित्रण केले आहे. 'पहिले महायुध्द संपले' (१९१९) टिळक युगाचा अस्त झाला. (१९२०) या दोन कादंबऱ्यांवर गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद त्याचबरोबर फ्राईडच्या मानसशास्त्राचा प्रभाव दिसतो. आपटे आणि जोशी यांच्या नंतर कादंबरीला 'बाळकृष्ण गडकरी' या कादंबरीकाराने नवी उभारी देण्याचे कार्य केले. त्यांनी

'सुधारणेचा मध्यकाल' 'दुर्दैवी प्रेमयोग' या दोन कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत.

हरिभाऊनंतर ऐतिहासिक कादंबरी समृध्द करणारे कादंबरीकार म्हणजे 'नाथमाधव' हे होत. 'प्रेमवेडा' (१९०५) 'सुहासिनी रायक्लब', 'गृहदशेचा फेरा', 'प्रेम आणि सूड', 'दोन भावंडे', 'दैवाचे खेळ', 'देशमुखवाडी', 'विमलेची गृहदशा', 'डॉक्टर' इ. सामाजिक कादंबऱ्यांतून बोधवादी विचार दिला आहे. सामाजिक कादंबऱ्यांपेक्षा ऐतिहासिक कादंबऱ्यांना अधिक लोकप्रियता मिळाली. 'स्वराज्याचा श्रीगणेशा' (१९२१), 'स्वराज्याची स्थापना' (१९२२), 'स्वराज्याचा कारभार (१९२३), स्वराज्याची घटना (१९२५), 'स्वराज्याचे परिवर्तन (१९२८), 'स्वराज्यावरील संकट (१९३०), इत्यादी.ऐतिहासिक कादंबऱ्यातून स्वराज्याची अस्मिता जपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

सारांश— १८७४ ते १९२० हा कालखंड विशेषत: नवनिर्मित विचारांचा कालखंड ठरला. या कालखंडाचे मुख्य वैशिष्टय म्हणजे समाज जागृती घडवून आणली. समाजवास्तवाचे सत्य चित्र रेखाटून हा कालखंड मुख्यत्वे या कादंबरीकारांनी समृध्द केला असेच म्हणावे लागेल.

## ३. इ.स. १९२० —१९४५ या कालखंडातील परिवर्तनीय विचारवादी कादंबरी वाङ्मय

इ.स. १९२० नंतर नवे पर्व सुरु झाले. १९२० मध्ये, टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा प्रारंभ झाला आणि समाजपरिवर्तन होऊ लागले. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडले. या साऱ्या घटनांचा परिणाम समाजावर झाला. तसा तो साहित्यावरही झाला. एक नवा दृष्टिकोन, एक वेगळे वळण घेऊन कादंबरी जन्माला आली. या कालखंडामध्ये अनेक कादंबरीकार निर्माण झाले. श्री.व्यं. केतकर, प्रा.ना.सी. फडके, वि.स.खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, मामा वरेरकर, दा.न. शिखरे, रघुवीर सामंत अशा अनेक

कादंबरीकारांनी मराठी कादंबरीत महत्वाचे योगदान देऊन मराठी कादंबरी यशाच्या शिखरावर नेऊन पोहचविली आहे.

या कालखंडातील पहिले कादंबरीकार म्हणून श्री.व्यं केतकर यांचा उल्लेख करावा लागेल. गोंडवनातील प्रियवंदा' (१९२६), 'परागंदा' (१९२६), 'आशावादी' (१९२७), गावसासू (१९३०), 'ब्राम्हणकन्या'(१९३०), 'विचक्षणा' (१९३६) इ. कादंबऱ्यांतून तत्कालीन परिस्थितीचे चित्रण करुन सामाजिक समस्या आणि समस्यामधील गतिशीलता दाखविली आहे.

साहित्यसम्राट 'न.चि.केळकर' यांनी 'नवलपूरचा संस्थानिक' 'बलिदान' 'कावळा आणि कपी' या कादंबऱ्यातून बोध करुन स्वत:चा असा वेगळा ठसा उमटविलेला आहे.

या कालखंडातील प्रसिध्द कादंबरीकार म्हणून ना.सी.फडके यांचा उल्लेख करावा लागेल. ७० कादंबऱ्या निर्माण करुन रंजनवाद जोपासला आहे. केवळ दोन घटका मनोरंजन व्हावे या हेतूने त्यांनी प्रचंड लेखन केले. त्यांच्या ललित लेखनाने एकेकाळी वाचकांना वेड लावले होते. 'मराठी भाषेच्या दरबारात दौलत उधळणारे महाराष्ट्राचे जादूगार' अशा सार्थ शब्दात शि.म.परांजपे यांनी त्यांचा गौरव केला आहे. 'कलेकरिता कला' हेच ललित कलेचे ध्येय आहे. वि. स. खांडेकरयांच्या कादंबऱ्यावर गांधीवादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. 'हृदयाची हाक' (१९३०) ही त्यांची पहिली कादंबरी होय. 'कांचनमृग' (१९३१), 'दोन धृव' (१९३४), 'उल्का' (१८३४), 'हिरवा चाफा' (१९३८), 'दोन मने' (१९३८), 'सुखाचा शोध'(१९३९), 'पहिलं प्रेम' (१९४०), 'क्रौंचवध (१९४२), 'अश्रु' (१९५३), अशा सर्व कादंबऱ्यांतून ध्येयवाद आणि आदर्शवाद जोपासण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

ग.त्र्यं.माडखोलकर यांनी मराठी कादंबरीला हातभार लावला. 'मुक्तात्मा (१९३३) ही त्याची पहिली कादंबरी लिहिली. 'भंगलेले देऊळ' (१९३४),

'कांता'(१९३९), 'दुहेरी जीवन;'(१९४०), 'नागकन्या' (१९४१), 'नवे संसार' (१९४१), 'डाकबंगला'(१९४२), अशा अनेक सामाजिक तसेच राजकीय कादंबऱ्या निर्माण करुन राजकारण आणि प्रणय याचे दर्शन घडविले आहे.

थोडक्यात फडके, खांडेकर, माडखोलकर या कादंबरीकारांनी या कालखंडात मराठी कादंबरी आकारास आणली असे म्हणावयास हरकत नाही. या कादंबरीकारांशिवाय काही कादंबरीकारांनीही कादंबरी विश्वाचा विकास केला आहे. त्यांचा उल्लेख येथे करणे क्रमप्राप्त ठरेल.

मामा वरेरकर 'चिमणी' (१९२६), प्र.ह.खाडीलकर (१९२७), 'विधवा कुमारी'(१९२८), भा.वि.वरेरकर, सात लाखांतील एक (१९३०), रा.शा.पाटील, सीता (१९३१), गोदू गोखले भाग १ व २ (१९३२—३३), 'धावता धोटा' (१९३३) , 'परतभेट'(१९३४), रामतनयांची (१९३६), वि.वा.हडप, 'अन्नदाता उपाशी' (१९३७), र.वा.दिघे, 'पाणकळा'(१९३९) 'समरांगण' म.भा.भोसले (१९४१) द.र.कवठेकरांची रेशमाच्या गाठी (१९४२) विठ्ठल दत्तात्रय चिंदकर 'महापूर (१९४२) कादंबरीकारांनी विविध विषय हाताळून लेखन केले. या कालखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे पुरुषाप्रमाणे स्त्रियांनीही कादंबरी लेखन करुन कादंबरीची वाटचाल पुढे नेण्यास हातभार लावला. काशीताई कानिटकर, गीता साने, जानकीबाई देसाई, शांताबाई, नाशिककर, कमलताई बंववाले अशा काही स्त्री लेखिकांनी वैवाहिक जीवनातील समस्यांचे चित्रण केले आहे. विभावरी शिरुरकर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून एक वेगळा ठसा उमटविला आहे. 'हिंदोळयावर' (१९३४) ही त्यांची पहिली कादंबरी स्त्रिच्या मनाची झालेली द्विधा अवस्था व्यक्त करताना दिसते. 'विरलेले स्वप्न' (१९३५) 'बळी' (१९५०) या कादंबऱ्यांनी वाचकाचे लक्ष एका वेगळया अनुभव विश्वाकडे वळवून घेतले.

या कालखंडामध्ये फडके, खांडेकर यांच्या लेखनाचा प्रभाव अधिक जाणवतो. या कालखंडातील कादंबरी स्वप्नरंजनाच्या मोहात गुरफटलेली दिसते. काय सांगितले यापेक्षा कसे सांगितले याला अधिक महत्त्व दिले गेल्याने ती एका चौकटीत बंदिस्त झाली. या कालखंडातील कादंबऱ्यांवर गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद, फ्राईड यांचा प्रभाव अधिक दिसून येतो. याला एखादी कादंबरीच अपवादात्मक ठरते. 'रणांगण' (१९३९) ही विश्राम बेडेकर यांनी वेगळया धर्तीची कादंबरी प्रसिध्द करुन एक नवीन प्रयोग केला आहे. फडके—खांडेकर माडखोलकर या कादंबरीकारांनी पूर्वीचाच कित्ता गिरवित कादंबरी लेखन केले आहे.

१९४० नंतर मात्र मराठी कादंबरीत नवनवीन प्रयोग होऊ लागले. बेडेकरांनी केलेला नवा प्रयोग नवदिशा देणारा असूनही फडके, खांडेकर—माडखोलकर यांच्या जोखडातून कादंबरी मुक्त झाली नाही हे ही तितकेच खरे आहे. एखादी दुसरी कादंबरी वगळता या कालखंडातील कादंबरी सुख स्वप्नातच रंगलेली दिसते. याच काळात र.वा.दिघ्यांनी 'पाणकळा'(१९३९) ही प्रादेशिक स्वरुपाची कादंबरी निर्माण करुन नवदिशा दिली. याच दरम्यान बा. सी.मर्ढेकर यांनी व्यक्तीमनातील गुंतागुंत संघर्ष याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. 'रात्रीचा दिवस' 'तांबडी माती' (१९४३) आणि 'पाणी' (१९४८) या कादंबऱ्यातून नव विचार मांडला.

**सारांश:—**

या कालखंडात कादंबऱ्या भरपूर प्रमाणात निर्माण झाल्या आहेत. संख्येने वाढलेल्या कादंबऱ्या मात्र वाङ्मयाचा विकास करु शकल्या नाहीत. या कालखंडाचा आणखी एक विशेष म्हणजे अनेक स्त्री लेखिकांचा उदय झाला. कादंबरी वाङ्मयाच्या प्रारंभिक कालखंडात एखाद—दुसरी स्त्री कादंबरीकार निर्माण झालेली दिसते. मधल्या काळात मात्र कुठेही स्त्री कादंबरीकाराचा

उल्लेख असल्याचे आढळत नाही. मात्र या कालखंडात अनेक स्त्री कादंबरीकारांनी वाङ्मयात भर घातलेली दिसून येते. या कालखंडातील कादंबरी वाङ्मयावर पहिले महायुध्द, साम्यवादी विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. नवनवीन प्रवाह उदयास येऊ लागले. या कालखंडात समग्र क्रांती झाली. कादंबरी विश्वात नव्या विचारांचे वारे वाहू लागले. हा कालखंड स्वातंत्र्योत्तर कालखंड म्हणून ओळखला जाऊ लागला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाचा प्रसार झाला. मासिके, ग्रंथालये, दिवाळी अंक यांची संख्या वाढली. मासिकातून कादंबऱ्या क्रमशः प्रसिध्द होऊ लागल्या. कथा कवितांतून, बा.सी.मर्ढेकर, गंगाधर गाडगीळांनी नवे बंड पुकारले होते. पण दुर्दैवाची बाब अशी की, कादंबरीच्या बाबतीत असे बंड कुणीही पुकारल्याचे आढळत नाही.

एकीकडे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली. औदयोगिकीकरण झाले. त्याचबरोबर बकाल जीवन, मनोविश्लेषण मार्क्सवाद या साऱ्यांचा परिणाम या कादंबऱ्यांवर झाला तर दुसरीकडे ग्रामीण जीवन प्रवाही होऊ लागले.

१९४५ नंतर मराठी कादंबरीत ग्रामीण कादंबऱ्यांचे पहिले पर्व सुरु झाले. श्री.ना.पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, बा.भ.बोरकर, रणजित देसाई, गो.नी.दांडेकर, र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ या लेखकांनी ग्रामीण कादंबरीची धुरा सांभाळली.

ग्रामीण कादंबरी वाङ्मयाचा सविस्तरपणे विचार आपण करणार आहोत.

## इ.स. १९६० नंतरची मराठी कादंबरी वाङ्मय

इ.स. १९६० हे वर्ष महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरले. इ.स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्यनिर्मिती होऊन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळींना उधान आले. या चळवळीचा परिणाम साहित्यावरही झाला. १९६० नंतर नवविचारांचे लेखक निर्माण झाले. तसेच नवनवे प्रवाह निर्माण झाले.

वेगळे विश्व धुंडाळणाऱ्या या कादंबऱ्यांचा उल्लेख मराठी साहित्यात 'नवी कादंबरी' म्हणून केला जातो. ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातील दुसरी पिढी निर्माण होऊन कादंबरी वाङ्मयात मोलाची भर घातली. असेच म्हणावे लागेल.

याच काळात कादंबरी निर्माण होत असताना ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, स्त्रीवादी असे ठळक प्रवाह निर्माण होऊन कादंबरीचे क्षितीज विस्तारले गेले असे म्हणणे उचित ठरेल. कादंबरी तिच्या स्वभावधर्मानुसार समाजजीवनाच्या अधिक जवळ सरकली. तिचे आशय सूत्र प्रादेशिकतेच्या अंगाने अधिक विस्तारले. रणजित देसाईंनी 'राधेय' 'स्वामी' 'श्रीमानयोगी' तर शिवाजी सावंत यांनी 'मुत्युंजय' 'युगंधर' या पौराणिक कादंबऱ्यातून महामानवातील माणूस शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या काळात भाषा व शैली याबाबत अधिक जागरुक व प्रयोगशीलता निर्माण झाली. विशेषत: धग (१९६०), माझा गाव (१९६०), देव चालले (१९६१), रथचक्र (१९६२), माणूस (१९६३), कोसला (१९६३), वैतागवाडी (१९६४) टारफुला (१९३४), इंधन (१९६५), चक्र (१९६३), अजगर (१९६५), स्वामी (१९६३) या कादंबऱ्यांतून हा बदल स्पष्टपणे नजरेत भरला.

या काळात ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षा पौराणिक, कादंबऱ्यांना भरघोस असे यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण कादंबरीचे क्षितीज विस्तृत करण्याचे प्रयत्न अनेक कादंबरीकारांनी केले आहेत. ग्रामीण कादंबरीचा सविस्तरपणे विचार करणार आहोत.

**सारांश:—**

आजच्या कादंबरीचे स्वरुप संमिश्रित आहे. कादंबरीत अनेकदा उथळपणा दिसतो. कादंबरीतील कथेचा बांधेसूदपणा हरवला आहे. शैलीचे नेमकेपण लोप पावल्याचे दिसते. प्रयोगशिलतेबरोबरच विस्कळीतपणा, विसंगत जीवनदर्शन या कादंबऱ्यांतून दिसून येते.

## कादंबरीचे स्वरुप आणि व्याख्या:—

'कादंबरी' हा समकालीन समाजवास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे. 'प्रादेशिक कादंबरी' हा हरिभाऊंच्या वास्तववादाचा पुढील काळातील अविष्कार होता. असे विधान कुसुमावती देशपांडे यांनी मराठी कादंबरीचा आढावा घेताना केले आहे. ' कादंबरी' या वाङ्मयं प्रकाराने स्वत:चे अस्तित्व निर्माण केले. 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराचा स्वतंत्रपणे अभ्यास समीक्षकांनी सुरु केला. कादंबरीचे स्वरुप तिच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. मानवी समाज स्थिरावल्यानंतर त्याच्या सांस्कृतिक प्रगतीचा एक भाग म्हणून इतर कला आणि साहित्य प्रकारांबरोबर कादंबरीचा जन्म झाला हे नाकारता येणार नाही. अर्वाचिन काळाचा विचार केल्यास कादंबरीचा उगम १८ व्या शतकात युरोपात झाला असे दिसते. डिफो, रिचर्डसन्, फिल्डिंग हे युरोपातील आदय कादंबरीकार ठरतात. मराठी कादंबरीला दिले गेलेले 'कादंबरी' हे सामान्यनाम संस्कृत परंपरा निर्देशिते.

कादंबरीचे मूळ स्वरुप तिच्या प्रकृतीतच आहे. या संदर्भात उषा हस्तक म्हणतात. " लयबध्द शब्दरचना हे जसे कवितेचे एक अंगभूत वैशिष्टच मानता येते तसे कादंबरीमध्ये तिच्या घडणीच्या संदर्भात दृग्गोचर होणारे एकही वैशिष्टय दाखवता येत नाही."[१०]

कादंबरीचे स्वरुप निश्चित करण्यासाठी काही निकष मानले गेले. या निकषांनी युक्त कादंबरीचे स्वरुप स्पष्ट होते. कोणत्याही एका वैशिष्टयानुसार कादंबरी निर्माण होत नाही. तर भिन्न भिन्न वैशिष्टयानुसार कादंबरी निर्माण होते असे म्हणावयास हरकत नाही. या वैशिष्टयानुसार कादंबरीच्या स्वरुपाची कल्पना स्पष्टपणे येऊ शकते.

### १ .विषय :—

'कादंबरी' या वाङ्मयप्रकारात 'विषय' हा अतिशय महत्त्वाचा घटक मानला जातो. कारण लेखकाला एखादया घटनेतून किंवा प्रसंगातून सुचलेल्या कथानकातूनही एखादा विषय सुचू शकतो.

### २ .कथानक :—

'कथानक' हा कादंबरीचा मुख्य गाभा असतो. कथानकात आरंभ, मध्य, अंत असतो. कथानकात सुसंघटितपणा, संभवनीयता, मौलिकता हे महत्त्वाचे गुण असतात. कथानक याचा अर्थ कादंबरीतील व्यक्तींची विशिष्ट सामाजिक वातावरणात घडलेली स्थिती होय. 'ॲरिस्टॉटल' कथानकाला कथेचा आत्मा मानतो. कथानकात उपकथानकालाही महत्त्व असते. कथानक आणि उपकथानक या दोघांच्या गुंफणीतून आकर्षक कथा निर्माण होते. या संदर्भात प्रा. गंगाधर गाडगीळ म्हणतात, " कादंबरीची रचना संघराज्याच्या घटनेसारखी आहे. कादंबरीत अनेक केंद्रे असतात. स्वतंत्रपणे विकास पावणारी कथाबीजे असतात. वेगवेगळया घटकातून रचलेल्या स्वायत्त संघटना असतात. त्या संघटनांचा परस्पर संबंध असतो. पुष्कळदा तिच्यातील कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्पर संबंध मात्र निश्चित असतो. तसे नसेल तर या संघटना कादंबरीत येणे अर्थशून्य असते."[११] यावरुन कथानक, उपकथानक यांचे परस्पर संबंध स्पष्ट होतात. कथानकावरच कादंबरीची उभारणी होत असते. आजच्या कादंबरीत कथानकाचे महत्त्व कमी आणि व्यक्तीकथांना महत्त्व अधिक प्राप्त झालेले दिसून येते.

### ३. वातावरण :—

'वातावरण' हा लक्षणीय असा विशेष मानला जातो. लेखक हा आपल्या कल्पनेच्या प्रतिभा शक्तीने वातावरण निर्मिती करत असतो. वातावरण निर्मितीमुळे व्यक्तिरेखांचे वर्तन कळून येते. कादंबरीतील कथानक आणि

व्यक्तिदर्शनाला उठावदारपणा प्राप्त करुन देण्यासाठी वातावरण निर्मितीची आवश्यकता असते. वातावरणाच्या चित्रणाने कादंबरीला पार्श्वभूमी प्राप्त होत असते. उदा. ऐतिहासिक कादंबरीत व ऐतिहासिक पार्श्वभूमीला महत्त्व असते. कादंबरीत चित्रित केलेले वातावरण हे कथानक व व्यक्तिरेखा यातील रहस्य उलगडण्यास फार उपयुक्त ठरते. सामाजिक कादंबरीत सामाजिक पार्श्वभूमीला महत्त्व असते.

## ४ व्यक्तिरेखा (व्यक्तिदर्शन):—

'कादंबरीचे' कथानक माध्यमातून साकार होत असते. कादंबरीच्या कथानकास महत्त्व प्राप्त होते. ते व्यक्तिरेखामुळेच. व्यक्तिरेखा हीच केंद्रस्थानी मानली जाते. संवाद, पात्र, निवेदन या तिन्ही माध्यमातून कादंबरीत व्यक्तिदर्शन घडविले जाते. प्रमुख पात्रे व गौण पात्रांचे व्यक्तिदर्शन कादंबरीत घडविलेले असते. विभिन्न स्वभावाच्या पात्रांच्या माध्यमातून मानवी जीवनाचे विश्लेषण व स्पष्टीकरण होत असते. व्यक्तिरेखांशिवाय कादंबरीची कल्पनाच करणे अशक्य असते. म्हणूनच एक प्रधान घटक म्हणून व्यक्तिरेखेला महत्त्व असते.

## ५.संवाद:—

'संवाद' हे कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्टय मानले जाते. संवादातून व्यक्तीचे स्वभावदर्शन घडते. संवादामुळे कथानकाला रंगतदारपणा प्राप्त होतो. व्यक्तिरेखांच्या मनातील भावभावना संवादातून समजतात. ' कादंबरीत' निवेदनाचा एक प्रकार म्हणून संवादाचा उपयोग केला जातो. वातावरण निर्मितीसाठी संवादाचा उपयोग केला जातो. चार्लस मार्गन या संदर्भात म्हणतात, ''कथानकाला गतिमान करणे व्यक्तिदर्शन घडविणे आणि वातावरण निर्मिती अथवा भाववृत्तीची निर्मिती करणे अशी संवादाची तीन कार्ये असतात''[१२] ''व्यक्तींच्या गरजांमुळे सभोवतालच्या जगाशी त्याचे अपरिहार्य संबंध निर्माण होतात. व्यक्तीचे अनुभवविश्व संवादातून साकार होत असते. या संबंधामागचे



BARR. ...
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

हेतू व स्वरुपे विविध असतात. या सर्व संबंधाना जोडण्याचे प्रयोजन आणि मानवी स्वरुप व्यक्त करण्याचे सुलभ प्रभावी माध्यम म्हणजे संवाद होत. संवाद मानवी जीवनाचे अविभाज्य अंग आहे.''[१३] संवादामध्ये बोजडपणा किंवा कृत्रिमता नसावी. निवेदन व संवाद यांची सांधेजोड कादंबरीत महत्त्वाची असते.

### ६ निवेदन:—

निवेदनाच्या सहाय्याने कादंबरी वाचनीय ठरते. कादंबरीचे कथानक गतिमान करण्यासाठी निवेदनाची आवश्यकता असते.

### ७.भाषाशैली (भाषा):—

भावना आणि विचार व्यक्त करण्याचे माध्यम म्हणजे भाषा हे होय. कादंबरीत प्रत्येक पात्रानुसार भाषा वापरली जाते. कादंबरीतील पात्रे, निवेदन, संवाद आणि प्रसंग यानुसार भाषा बदलत जाते. कादंबरी रचनेत भाषेला महत्त्वाचे स्थान असते. लेखकानुसार भाषा, स्वरुप बदलत असते. व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशातील भाषा वापरली आहे. तर उद्धव शेळक्यांनी कादंबऱ्यात विदर्भातील बोलीभाषा वापरली अर्थात अलिकडे ही बोलीभाषा निवेदनावर अधिक प्रभाव टाकू लागली आहे.

थोडक्यात, वरील वैशिष्टयावरुन कादंबरीचे स्वरुप स्पष्ट होते. या वैशिष्टयावरुन कादंबरीच्या स्वरुपाची कल्पना स्पष्ट होते. या स्वरुपावरुन समीक्षकांनी कादंबरीच्या व्याख्या केल्या आहेत.

पाश्चात्य साहित्यिकांनी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराच्या केलेल्या व्याख्या—

१. सर वॉल्टर स्कॉट:—

"The most marked distinction between a real and a fictitious narrative (is) that the former,in reference to the remote cause of the events it relates, is obscure.....where as in the latter case it is a part of the authors duty to .... account for every thing" [14]

२. इयान वॅट:—

" With the help of their larger perspective the historians of the nove have been able to do much more to determine the idiosyn critic features of the new from. Briefly they have seen realism as the defining characteristic which differentiates the work of early eighteenth century novelists form previous fiction" [15]

३. विल्यम लिटील:—

"Novel is a fictitious prose narrative of considerable length in which characters and actions representative of real life are portrayed in a plot of more or less complexity." [16]

४. अर्नेस्ट बेकर:—

" The interpretation of human life by means of fictitious narrative in prose" [17]

५. कॅथेरीन लिव्हर—

"A novel is the form of written prose narrative of considerable length involving the reader in an imagined real world which is new because it has been created by the auther."[18]

मराठी समीक्षकांनी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराच्या केलेल्य विविध व्याख्या—

१. ना.सी. फडके:—

''एखादया व्यक्तीची विशिष्ट इच्छा अनेक अडचणीतून आणि संकटातून मार्ग काढून कशी सिध्दीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली, याची कहाणी म्हणजे कादंबरी.''[१९]

२. एस.सी वेल्स:—

" कादंबरी ज्यात सर्व काही सामावते अशी 'गारुडयाची थैली' अशी कादंबरीची थोडी विनोदी वाटणारी व्याख्या केली आहे."[२०]

३. अ.का.प्रियोळकर:—

" संस्कृत भाषेत बाणाची कादंबरी नावाची जी कल्पित बृहत्कथा आहे. तशासारखा मराठीतील वाङ्मयप्रकार म्हणून मराठीतील कल्पित दीर्घकथेला 'कादंबरी' हे नाव मिळाले."[२१]

४. प्रा.श्री.मा.कुलकर्णी:—

" कार्यकारण शृंखला बद्ध अशा कल्पित कथानकाच्याद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गदय कथा म्हणजे कादंबरी."[२२]

५. एम ॲबेल चेव्हेली:—

"जिला काही विस्तार आहे अशी गदय कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय."[२३]

६. रा.ग.जाधव:—

" कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरुप अशी निवेदन तंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इत्यादी घटकांनी गदयात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तवजीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय."[२४]

७. स.ग.मालशे:—

" कादंबरी निखळ सत्यापेक्षा कमी लोकविलक्षण आणि म्हणून अधिक प्रातिनिधिक चित्रण करणारी असते."[२५]

८. श्री.ना.पेंडसे:—

"कादंबरी म्हणजे जीवन प्रवाहाचा सलग स्वयंपूर्ण छेद असतो"[२६]

(हिंदी समीक्षकांनी 'कादंबरी' या वाङ्मय प्रकाराच्या केलेल्या व्याख्या)

९. प्रेमचंद:—

" मै उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उनके रहस्यों को खोलना ही उपन्यासों का मूल तत्व है।"[२७]

**समारोप:—**

कादंबरीची संकल्पना मांडताना किंवा कोणतीही संकल्पना मांडताना अभ्यासगत विषयाचा सर्व बाजूंनी विचार होणे गरजेचे असते. या विचारात उत्पत्ती विषयक, घटक विषयक व्याख्या विषयक प्रश्न चर्चावयाचे असतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये, कादंबरीची अशीच संकल्पना किंवा तिचा तात्विक विचार मांडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.कादंबरीच्या स्वरुपावरुन अनेक समीक्षकांनी कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला असला तरीदेखील सर्वमान्य अशी व्याख्या करणे अजून तरी शक्य झालेले नाही. ही बाब नाकारता येणार नाही.

## क. ग्रामीण कादंबरीचा उदय आणि वैशिष्टये :—

मराठी साहित्य विश्वात 'ग्रामीण' हा साहित्यप्रवाह खळखळणाऱ्या पाण्यासारखा वाहताना दिसतो. ग्रामीण साहित्याने अनेक चढ—उतार पार करीत आपला प्रवाह अखंड वाहता ठेवला आहे. आजच्या ग्रामीण साहित्याने एक उंची प्राप्त करुन स्वत:चा असा एक वेगळा ठसा साहित्यात उमटवला आहे.

**ग्रामीण साहित्याच्या पाऊल खुणा:—**

मराठी साहित्यात 'ग्रामीण' ही संकल्पना सर्वसाधारणपणे १९२५ पासून उदयास आली असे मानले जात असले तरी प्राचीन साहित्यात काही

'ग्रामीणत्वाच्या' पाऊलखुणा सापडतात. प्राचीन काळात लोककथा अस्तित्वात होत्या. या लोककथामधून काही प्रमाणात ग्रामीण जीवनाचे प्रकटीकरण केलेले दिसून येते. 'ग्रामीण' संकल्पनेत ग्रामीण जगण्याच्या रीतीचा अंतर्भाव होतो. नव्या ग्रामीणतेला एक मूल्याधिष्ठित आणि समानतेच्या पायावर उभे असणारे जग अपेक्षित आहे. म्हणूनच 'ग्रामीणता' ही संकल्पना अधिक व्यापक होते. सर्वसमावेशक होते. सर्व प्रकारच्या शोषणाविरुध्द उभ्या राहणाऱ्या साहित्य प्रवाहांची ती सहकारी तरी होईल किंवा अशा प्रवाहांना पोटात घेऊन एक मोठे रुप तरी धारण करील. लोककथांचे संपादन कर्ते, यु.म.पठाण यांनी एका माळवी कथेच्या संदर्भात मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते,'' .... ''माळवी लोककथेत ग्रामीण जीवन आणि मध्ययुगीन इतिहासाच्या तेजस्वी छटा प्रकट झाल्या आहेत.''[२८]

दृष्टांत पाठानंतर ग्रामीण जीवनाचे चित्रण महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संतांच्या अभंगवाणीतून प्रकट होताना दिसते. उदा. संत सावतामाळी यांच्या,'' आमुचि माळियाची जात। शेत लावु बागाईत''[२९] या अभंगातून ग्रामीणत्वाची जाणीव होते. या शिवाय नरहरि सोनारांसारखे एखादे संत आपल्या व्यवसायाचा उल्लेख आपल्या अभंगातून करताना दिसतात. ग्रामव्यवस्थेतील दाहक जीवनाचे चित्रण अतिशय तीव्र शब्दात चोखामेळा मांडताना दिसतात. या सर्व संतांची भाषा म्हणजे ग्रामीण भागात बोलली जाणारी भाषा आहे. हे लक्षात येते.

## सारांश :—

अभंगातून ग्रामीण जीवनाचे चित्रण सहजपणे येऊन जाते. अजाणतेपणे किंवा अस्पष्टपणे का हाईना पण प्राचीन मराठी वाङ्मयात ग्रामीणत्वाच्या काही खुणा प्रकट झालेल्या दिसतात हे मान्य करावे लागेल.

## आधुनिक काळातील ग्रामीण साहित्यः—

१९ वे, शतक हे अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरते. या शतकाच्या पूर्वार्धात इंग्रजी शिक्षणामुळे महाराष्ट्रात नव्या जाणिवा निर्माण झाल्या. तसेच नवे विचार मंथन सुरु झाले. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जडणघडणीत अमूलाग्र परिवर्तन घडले हे परिवर्तन साहित्यातही घडणे अपरिहार्यच होते. याच काळात महाराष्ट्रात अनेक समाजसुधारक निर्माण झाले. महात्मा फुल्यांनी मानवी हक्कासाठी आयुष्यभर लढा दिला. 'शेतकऱ्याचा आसूड' हा वैचारिक ग्रंथ लिहून ग्रामीण जीवनचित्रणाचा पहिला स्पर्श मराठी साहित्याला घडविला असे म्हणणे अधिक उचित ठरेल. ग्रामीण समाज म्हणजे खेडयात राहणारा व प्रामुख्याने शेती व्यवसायाशी संबंधित असलेला समाज होय. व्यवसायाचे प्राधान्य मानवनिर्मित वातावरणाऐवजी निसर्गाचे सान्निध्य, समाजाचा आटोपशीर आकार, तुरळक वस्ती, भौगोलिक, मर्यादित भाग व एकजिनसीपणा इ. वैशिष्टयामुळे ग्रामीण समाज हा शहरी समाजापासून वेगळा मानला जातो. म. फुले यांना प्रेरणास्थानी ठेवायचे असेल तर अशा ज्या भाकडकथा सांगून ग्रामीण मानसिकतेचे शोषण केले जाते. या शोषणाचा आलेख सत्याच्या पातळीवर, विवेकाच्या पातळीवर ग्रामीण साहित्यिकांनी साहित्यामध्ये आणला. 'शेतकऱ्यांचा आसूड' ही समकालीन सामाजिक परिस्थितीचे सजगभान वागवणाऱ्या विचारवंत लेखकाची निर्मिती आहे असे विधान स.गं.मालशे यांनी केले. 'शेतकऱ्यांचा आसूड' हा महात्मा फुल्यांचा ग्रंथ लिहून ग्रामीण जीवनचित्रणाचा पहिला स्पर्श मराठी साहित्याला घडविला असे म्हणणे अधिक उचित ठरेल. 'शेतकऱ्यांची दु:स्थिती आणि त्यावर उपाय याचे विवेचन या ग्रंथात केले आहे. या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा महात्मा फुल्यांचा ग्रंथ त्यांच्या चिंतनशीलतेची झेप किती उंच आहे हे दाखविणारा जरुर आहे. पण वाङ्मयीन गुणवत्तेच्या दृष्टीने तो सरस आहे. याकडे मात्र कायम दुर्लक्ष झाले आहे.''[३०] अशी खंत नागनाथ कोत्तापल्ले

यांनी व्यक्त केली आहे. समीक्षकांच्या दृष्टीकोनातून दुर्लक्षीत झालेला 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ ग्रामीण साहित्याचा पाया रचणारा ग्रंथ ठरला.

महात्मा फुल्यांच्या विचारांचा प्रभाव असलेले कृष्णराव भालेकर या प्रभावी कार्यकर्त्याने शेतकऱ्यांचे प्रश्न 'दीनबंधू' तून मांडले. कृष्णराव भालेकरांनी 'बळीबा पाटील (१८८८) दीनबंधूतून क्रमशः छापली होती. स्फूट गोष्टीचे निर्माते ह.ना. आपटे यांनी 'काळ तर मोठा कठीण आला (१८९८) कथेतून खेडयातील ग्रामीण जीवनाचे मागासलेपणा, रुढी, परंपरा यांचे चित्रण केले आहे. पण हरिभाऊंच्या साहित्याला ग्रामीण मानले जात नाही.

२० व्या, शतकाच्या प्रारंभी 'धनुर्धारी' यांनी लिहिलेल्या 'पिराजी पाटील' (१९०३) या कादंबरीने ग्रामीण जीवनाचे वास्तव रुप धारण केलेले दिसते. या कादंबरीत १९ व्या शतकाच्या शेवटच्या २०—२५ वर्षातील दुष्काळी खेडयाचे अतिशय वास्तवदर्शी आणि प्रभावी दर्शन घडविले आहे.

### 'ग्रामीण' साहित्य संकल्पना:—

''ग्रामीण जीवनावरील मराठी कादंबरी'' याच्यावर एक संशोधनात्मक प्रबंध लिहिता येईल. इतकी ग्रामीण जीवनावरील कादंबऱ्यांची संख्या वाढली असून क्रमशः या कादंबरीच्या स्वरुपातही फरक पडला आहे.''[३१] असे भाकीत सुमारे पंचवीस वर्षापूर्वी बापट—गोडबोले यांनी केले होते. आज ते खरे ठरले आहे.

मराठी साहित्यात 'ग्रामीण' ही संज्ञा सर्वसाधारणपणे १९२५ पासून रुढ झाली आहे. कोणतीही संकल्पना किंवा संज्ञा एकदम अस्तित्वात येत नसते.

ग्राम म्हणजे खेडं, आपला भारत देश हा खेडयांचा देश आहे. ७० ते ८० टक्के समाज खेडयांमध्ये राहतो. शेतकरी हा खेडयातील प्रमुख घटक आहे. साहित्यातील 'ग्रामीणत्व' एक स्वतंत्र संस्कारमूल्य आहे. ही एक वेगळी

संवेदनशिलता आहे. बोलतानाही आपण सहज म्हणत असतो की तो शहरात वाढलाय त्याच्यावर शहरी वातावरणाचा प्रभाव आहे. त्याला त्याची सवय आहे आणि हा ग्रामीण भागात वाढलाय त्याच्यावर खेडयातले संस्कार आहेत. वगैरे. यातून अप्रत्यक्षपणे आपण दोन व्यक्तिमध्ये असलेली संस्कार भिन्नता स्पष्ट करुन सांगत असतो. खेडयात आजसुध्दा शेतकऱ्यांच्या घरात 'आमचा शेती धर्म' आहे असे उद्‌गार ऐकायला मिळतात. 'ग्रामात' म्हणजे 'गावगाडयात' अनेक व्यवस्थांचे जाळे असते. हे सांगता येईल. शहरी माणूस संकुचित, आत्मकेंद्री, तसाच तो मतलबी परिस्थितीनुरुप बदलणारा म्हणजे गतीशील असा असतो. सुखवस्तु जीवनाचे त्याला आकर्षण असते. याउलट 'ग्रामीण माणूस' स्थितिशील परिस्थितीशी चिवटपणे झगडणारा, दैववादाला शरण जाणारा, पारंपारिक जीवनाशी चिकटून राहणारा नव्या बदलाने आचंबित होणारा; जमवून न घेणारा जुने तेच सोने मानणारा आहे. अर्थात हा भेद सर्वसाधारण स्वरुपाचा म्हणूनच सांगता येतो. ग्रामीण व्यक्ती ही कुटुंबाला, कुटुंब जातीला आणि जात गावगाडयाला बांधलेली असते. या साऱ्या विवेचनातून असे लक्षात येते की, माणसाच्या मनोविश्वाचे आणि व्यवहाराचे चित्र ग्रामीण साहित्यातून प्रकट होत जाते. ग्रामीण जीवनातील वास्तव प्रकट होते. "खेडे म्हटले की अगोदर चटकन काळीच डोळयापुढे उभी राहते. शेते, पिके, गवत, झाडे, गुरेढोरे, शेळया, मेंढया, मेंढके, शेतकरी, गुराखी, पाट, बुडक्या विहिरी, नांगर, कुळव, मोट, मळा, गोफण वगैरे बळीराजाचे वैभव खेडयाचे नाव काढताच इतके मन व्यापून टाकते."[३२]

कृषी जीवनाशी निगडीत असणारे सण—उत्सव साजरे केले जातात. ग्रामीण जीवन हे शेती, पाऊस निसर्गातील घटक यांच्याशी निगडित असते. भारतीय शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असते. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी दैववादी बनतो. आणि आदिमातेकडे झुकत असतो. माणसाच्या

मनोविश्वाचे आणि व्यवहाराचे चित्र ग्रामीण साहित्यातून प्रकट होत जाते. ग्रामीण जीवनातील वास्तव प्रकट होते.

## सारांश:—

ग्रामीण साहित्यात ग्रामीण माणसाचे माणूस म्हणून असणारे धर्म प्रकट होतात. ग्रामीण साहित्य हे व्यक्ती केंद्रित असते. ग्रामसंस्कृतीतूनच 'ग्रामीण' साहित्याची संकल्पना उदयास आली आणि ती रुढही झाली.

## ग्रामीण साहित्यविकास:—

ग्रामीण साहित्याचा उदय आणि विकास खऱ्या अर्थाने २० व्या, शतकात झाला. १९ व्या शतकात ग्रामीण साहित्याचा पाया रचला गेला. आणि २० व्या शतकात खरेखुरे ग्रामीण साहित्य उदयास आले. 'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना १९२५ पासून रुढ झाली. तेव्हापासून ग्रामीण जीवनातील वास्तव चित्र मराठी साहित्यात दिसू लागले. ग्रामीण साहित्यात पहिला अविष्कार कवितामधून झाला. कवितांमधून ग्रामीण जीवन उमटू लागले. पण या कवितांवर इंग्रजी कवितांचा प्रभाव जाणवतो. इंग्रजीतील 'पॅस्टोरल पोएट्री (Postoral Poetry) वरुन मराठीत जानपदगीते, गोप—गीते निर्माण झाली. असली तरी ग्रामीण साहित्याला एक दिशा मिळाली हे निश्चित मानावे लागेल.

१९२० मध्ये, टिळकयुगाचा अस्त झाला. आणि गांधीयुगाचा प्रारंभ झाला. 'गांधीवाद' ग्रामीण साहित्याचा प्रेरणास्त्रोत ठरला. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक—धार्मिक परिवर्तन घडले. सारा समाज ढवळून निघाला. या सर्व घटनांचा परिणाम साहित्यावरही तितकाच प्रखरतेने झाला. साहित्यातही नवे परिवर्तन झाले. गांधीजींच्या विचारांनी साऱ्या जीवनाला व्यापून टाकले होते. 'खेडयाकडे चला' हा मूलमंत्र गांधीजींनी जनतेला देऊन खऱ्या भारताचे दर्शन खेडयात घडविले. खेडयाचे महत्त्व नव्या जाणिवासह पटवून दिले. १९२५ नंतर ग्रामीण साहित्यावर गांधीजींच्या विचाराचा प्रभाव अधिक जाणवतो.

१९२५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात वेगळेपण जाणवत असले तरी मराठी साहित्यापेक्षा फारसे वेगळे वाटत नाही. या संदर्भात नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत विचारात घेऊ त्यांच्या मते, १९२५ नंतर अवतरणाऱ्यां ग्रामीण साहित्यामागील प्रेरणांचे वेगळेपण दिसत असले तरी स्वरुप मात्र तत्कालीन एकूण मराठी साहित्यापेक्षा फारसे वेगळे नाही.

१९२३ मध्ये, रविकिरण मंडळाचा उदय झाला. १९३२ मध्ये, ग.ल. ठोकळांनी 'मीठभाकर' हा प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रसिद्ध करुन ग्रामीण जीवन चित्रण केले आहे. याच दरम्यान ग्रामीण साहित्यात एक नवा प्रवाह येऊन मिळाला. तो प्रवाह म्हणजे 'प्रादेशिक' ग्रामीण संज्ञेप्रमाणे 'प्रादेशिक' ही संज्ञाही रुढ झाली. साधारणत: १९२७–२८ पासून प्रादेशिक जीवनचित्रण साहित्यातून प्रकट होऊ लागले होते. वि.स.सुखटणकरांच्या 'सहयाद्रीच्या पायथ्याशी' (१९३१) या कथा संग्रहातून गोमांतक प्रदेशाचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९३० साली मडगावच्या साहित्य संमेलनात 'प्रादेशिक' ही संज्ञा ऐकल्याचे कवी बा.भ.बोरकरांनी सांगितले आहे. ग्रामीण साहित्य आणि प्रादेशिक साहित्य यामध्ये काहींनी भेद मानलेला आढळतो. पण, परिसर म्हणजेच प्रदेश हे मान्य असल्यास ग्रामीण व प्रादेशिक या संज्ञा समानधर्मीच आहेत. हे मान्य होण्यास हरकत नाही. ''प्रादेशिक ही संज्ञा 'ग्रामीण' संज्ञेपेक्षा जास्त व्यापक आहे. असे फार तर म्हणता येईल.''[३३] प्रादेशिक वाङ्मय हे ग्रामविभागातील समूहजीवन दर्शन आणि ग्रामीण वाङ्मय म्हणजे ग्रामविभागातील व्यक्तीनिष्ठ जीवनदर्शन असा भेद करुन प्रादेशिक वाङ्मय हे त्या प्रदेशातील ग्रामजीवनाचेच चित्रण असते. असा समन्वय साधून 'ग्रामीण वाङ्मय' या शब्दावर अधिक भर यादवांनी दिलेला आहे. 'प्रादेशिक' आणि 'ग्रामीण' या दोन संज्ञामध्ये काही साम्य भेद दिसून येत असले तरी हे दोन्हीही प्रवाह एकमेकांत गुंतलेले आहेत. असेच म्हणणे अधिक योग्य ठरेल. ग्रामीण संज्ञेबाबतच प्रादेशिक संज्ञेची वाटचाल झाली आहे. १९२०–१९४० या

कालखंडातील कादंबऱ्यांचे स्वरुप सारांश रुपाने सांगायचे झाले तर असे सांगता येईल की, खेडयाच्या उध्दारातच एकूण देशाचा उध्दार आहे. या जाणिवेने उपरोल्लित लेखक वळले. त्यांनी ग्रामीण जीवनातील सर्वस्तरांवरील विषमता, दैन्य, अज्ञान, अंधश्रध्दा, ग्रामीण माणसाची रुढिप्रियता नाहीशी करुन त्यांच्यात आत्मभान निर्माण करणे हीच या लेखकांची लेखन प्रेरणा होती. १९३८ नंतरच्या काळात भारतीय स्वातंत्र्युध्द कमालीचे गतिमान बनले. क्रांतीची बीजे खेडयापाडयातील सामान्य माणसांपर्यंत पोहोचली. अनेक लेखक विचारवंत राजकीय प्रक्कते यांनी आपले लक्ष खेडयाकडे वळविले. याचाच परिपाक म्हणून एकूण मराठी कादंबरी मध्येच परिवर्तन आले. यातूनच प्रादेशिक कादंबरी अवतरली ही प्रादेशिक कादंबरी एक प्रकारे ग्रामीण कादंबरीच होती. लेखनाचे विषय, प्रदेश त्या प्रदेशातील निसर्ग, हवामान, वातावरण, समाजव्यवस्था, सण, उत्सव, सुखदु:खे, नीति, अनीती जगण्याच्या पध्दती, भाषा, वाक्यप्रचार, म्हणी त्यांच्या विविध रुढ कल्पना त्यांची दैवते, संघर्ष, समस्या, व्यथा, कथा यांचे खोलवर निरीक्षण करुन तिथल्या समाज जीवनाशी एकजीव होऊन तो विशिष्ट भूप्रदेश, प्रादेशिक कादंबरीत चित्रित करण्यात आला.

'पाणकळा' १९३९ र.वा. दिघ्यांनी निर्माण करुन प्रादेशिकतेची खाण शोधली.

१९४१ ते १९६० च्या दरम्यान ग्रामीण साहित्याला नवी दिशा मिळाली. श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर यांनी ग्रामीण जीवनाचा अनुभव आपल्या लेखणीतून समृध्दपणे अविष्कृत केला. याच काळात ग्रामीण साहित्यात नवे पर्व सुरु झाले. नव्या चाकोरीतील ग्रामीण लेखकांचा उदय झाला. व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार अशा काही लेखकांनी ग्रामीण साहित्याला एक नवदिशा दिली.

ग्रामीण स्त्री लेखिका उदयास आल्या. बहिणाबाई चौधरी प्रतिमा इंगोले या ग्रामीण स्त्री लेखिकांनी ग्रामीण साहित्य विस्तारात मोलाचा हातभार लावला

आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या बनगरवाडी (१९५५) या कादंबरीने 'प्रादेशिक' हा शब्द सार्थकी लावला असे म्हटले तरी वावगे ठरु नये.

१९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याने फार मोठी झेप घेतली. या काळात ग्रामीण लेखकांची नवविचारांची नवी पिढी उदयास आली. रा.रं.बोराडे, आनंद यादव, ना.धो.महानोर, महादेव मोरे, सखा कलाल, बाबा पाटील, शंकरराव खरात, आनंद पाटील याशिवाय अन्य लेखकांनी विविध भागातील ग्रामीण वास्तवाचे जीवन चित्रण करुन बदलत्या ग्रामीण वास्तवाला लक्षणीय पध्दतीने हाताळले आहे.

१९७५ नंतर ग्रामीण साहित्यास नव उभारी मिळाली. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा उदय होऊन या चळवळीतून ग्रामीण लेखकांचा एक वर्ग उदयाला आला. अरुण साधू, राजन गवस, चंद्रकुमार नलगे, देवदत्त पाटील, नागनाथ कोत्तापल्ले योगिराज वाघमारे, इंद्रजित भालेराव, मोहन पाटील, सदानंद देशमुख या लेखकांनी ग्रामीण साहित्यात अमूल्य अशी भर घातली आहे.

प्रा. मोहन पाटील हे १९८० नंतरच्या पिढीतील एक ठळक सृजनशील लेखक त्यांच्या कथा, कादंबऱ्यांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. म्हाराष्ट्रात साखर, कारखानदारी जसजशी वाढत गेली तस तशा शेतकऱ्यांच्या समस्याही वाढू लागल्या. शेतकऱ्यांची व्यथा—कथा, ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आगतिकता प्रा. मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीतून मांडली. त्यांनी ग्रामीण साहित्याला नवे परिमाण प्राप्त करुन दिले. प्रा. मोहन पाटील यांचे ग्रामीण साहित्यात दिलेले योगदान किती मोलाचे आहे. याचा अभ्यास दुसऱ्या प्रकरणात सविस्तरपणे करुन घ्यावयाचा आहे.

### ग्रामीण साहित्य व्याख्या:—

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याने महत्त्वाचे स्थान प्राप्त केले असले तरी ग्रामीण साहित्य समीक्षा उपेक्षितच राहिली आहे. एखादा समीक्षक ग्रामीण

साहित्याचे लेख किंवा एखादा ग्रंथ निर्माण करतो. 'ग्रामीण साहित्य निर्मिती होऊन आज ७५ वर्षे होऊन गेली तरी ग्रामीण साहित्याची समीक्षा करणारे समीक्षक अगदी बोटावर मोजण्याइतकेच आहेत. ही फार मोठी ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने दुर्दैवाची बाब आहे.

१९६० नंतर ग्रामीण साहित्याने नवे रुप धारण केले. विविध भागातून ग्रामीण लेखकांचा उदय झाला. १९७५ नंतर ग्रामीण साहित्यात क्रांती घडून आली. ग्रामीण साहित्याची प्रथम दखल घेऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला. तो 'आनंद यादव' या ग्रामीण लेखकानेच. ग्रामीण साहित्याच्या अभ्यासाला यादवांचे ग्रंथ एक वरदानच ठरले असे म्हणावे लागेल.

आनंद यादवानंतर मराठी साहित्य समीक्षेत ग्रामीण साहित्यावर समीक्षा करणारे अनेक समीक्षक निर्माण झाले. नागनाथ कोत्तापल्ले, भालचंद्र नेमाडे, चंद्रकुमार नलगे, रवींद्र ठाकूर, मोहन पाटील हे समीक्षक ग्रामीण साहित्याला लाभले. ग्रामीण साहित्याचा सखोलपणे अभ्यास करुन त्याच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केला असला तरी देखील ग्रामीण साहित्याला कोणत्याही एका व्याख्येत बांधणे अशक्यप्राय आहे. यावरुन ग्रामीण साहित्याचा प्रवाह किती विस्तारित स्वरुपाचा आहे याची कल्पना येते.

१. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले:—

''ग्रामीण संस्कृती तसेच ग्रामीण मानसिकता आणि ग्रामीण जीवन पध्दती याचे दयोतक घडविणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.''[३४]

२. भालचंद्र नेमाडे:—

''ग्रामसंस्कृतीची ओढ आणि त्यातील आनंद तत्वाबद्दलची आस्था ग्रामीण साहित्यातून प्रकट होते.''[३५]

३. डॉ. आनंद यादव:—

"खेडेगाव तेथील जीवन पध्दती, खास अशा रीती, शेती, तेथील निसर्गाशी, मातीशी असलेले मानवी पण प्रदेशनिष्ठ वैशिष्टयपूर्ण संबंध तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये, मानवी जीवनाला लाभलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक, मर्यादा व त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, समस्या इ. सर्व अनुभूतीतून निर्माण झालेले साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय."[३६]

'ग्रामीणता' साकार होण्यामध्ये कृषिनिष्ठ संस्कृती, निसर्ग सन्मुखता यातून निर्माण झालेले लोकमानस हे घटक महत्त्वाचे ठरतात. यातूनच जगण्याची एक 'रीत' साकार होत जाते या रीतीचे चित्रण ज्या साहित्यात आढळते ते ग्रामीण साहित्य.

## क. ग्रामीण कादंबरी उदय:—

१९ वे शतक हे सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक या सर्व दृष्टीने एक क्रांतीपर्व ठरले. मराठी साहित्यातही क्रांती घडून आली. ' कादंबरी' वाङ्मयाचा पाया रचला गेला. मनोरंजनावादी आणि 'अद्‌भूतरम्य' कादंबऱ्या निर्माण झाल्या. या सर्व कादंबऱ्या केवळ वाचकांचे मनोरंजन करणाऱ्या होत्या. 'यमुनापर्यटन' (१९५७) ही बाबा पद्‌मनजी यांनी कादंबरी निर्माण करुन समाजातील वास्तव चित्रण रेखाटले. महात्मा फुल्यांसारखा थोर समाजसुधारकाने 'शेतकऱ्याचा आसूड' (१८८३) हा ग्रंथ लिहून ग्रामीण जीवन चित्रणांचा पहिला वहिला स्पर्श मराठी साहित्याला घडविला. हा ग्रंथ म्हणजे शेतकऱ्यांच्या शोषणाचा महालेख ठरतो. या ग्रंथाने मराठी साहित्यात ग्रामीण कादंबरीची 'मुहुर्त मेढ' रोवली असे म्हणावे लागेल.

## ग्रामीण कादंबरी मुहूर्त मेढ:—

सर्वसामान्य माणसांप्रमाणेच साहित्याची निर्मिती करणारा संवेदनशील मनाचा सर्जनशील साहित्यिक हाही त्या त्या काळाचा त्या त्या काळात घडणाऱ्या घटनांचा, प्रसंगाचा, साक्षीदार असतो. एवढेच नव्हे तर एकूण समाजाच्या स्थिती, गतीचा अधोगतीचा, उत्क्रांतीचा तो साक्षीदार असतो. कधी कधी तर तो स्वत:च काळाच्या लाटेवर हेलकावणाऱ्या जहाजातील एक प्रवासी असतो.

अशा वेळी तो प्रत्यक्षानुभव घेणे आणि तो साहित्यातून नोंदवणे अशी दोन्ही कामे करीत असतो. एकूण मराठी कादंबरीचा इतिहास बघितला तरी आपणास उपरोक्त विधानाचाच प्रत्यय येईल सामान्यपणे मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून 'यमुनापर्यटन' या साहित्य कृतीचाच उल्लेख करण्यात येतो. 'यमुना पर्यटन' नंतर सुमारे २५—२६ वर्षांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा वास्तववादी ग्रंथ निर्माण झाला. हा ग्रंथ शेतकऱ्याच्या दारिद्रयाचा दस्तऐवज ठरला गेला पण ग्रामीण साहित्याचे जनक डॉ. आनंद यादव यांनी या ग्रंथाचे मोल ओळखून न्याय देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. आनंद यादव ग्रंथाच्या गदय शैलीविषयी लिहितात, 'शेतकऱ्यांचा आसूड' मधील गदयरचना तर निबंधापेक्षा सर्वार्थाने बखरीच्या प्रकृतीला जवळची वाटते. या पुस्तकात सत्याचे तत्कालीन पध्दतीने विवरण करीत ते सत्य पटवून देण्याच्या विदग्ध नैबंधिक पद्धतीपेक्षा स्वत:च्या मनाला आगोदरच पटलेले व्यापक सत्य फक्त अनुकूल उदाहरण देऊन उपरोध उपहासाच्या वापराने रोचक करुन प्रभावी शब्दचित्रे रेखाटून प्रसंगी भावनात्मक आवाहन करुन पुन्हा पुन्हा वेगवेगळया पद्धतीने अविष्कृत करुन वाचकाच्या मनावर खोल खोल बिंबवत जाणे ही त्याच्या गदयलेखनाची प्रकृती बखरीला अतिशय जवळची आहे.''[३७]

शेतकऱ्याचा आसूड विषयी स.ग. मालशे लिहितात, ''शेतकऱ्याच्या दुस्थितीचे विदारक चित्र रेखाटून त्यांचा प्रश्न पोटतिडिकीने धसास लावू पाहणारे हे पुस्तक आहे. असे नमूद केले. शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चित्र रेखाटताना

फुले यांनी त्याच्या हीन—दीन गृहस्थितीचे जे वेधक वर्णन केले आहे. ते एखादया ग्रामीण वास्तववादी कादंबरीला लाजवील इतके प्रत्ययकारी आहे.''[३८]

ग्रामीण कादंबरीच्या पाऊल खुणा महात्मा फुल्यांच्या ग्रंथात दिसून येतात. वास्तववादी चित्रण करणाऱ्या फुल्यांना आनंद यादवांनी 'आधुनिक देशी मराठी साहित्याचे आदय जनक' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला आहे. महात्मा फुल्यांनी गावरान शैलीतील मराठी वाङ्मयाची मुहूर्तमेढ रोवली हे निश्चितच मान्य करावे लागेल.

## ग्रामीण कादंबरीचे पहिले पर्व:— (१८७४—१९२०)

ग्रामीण कष्टकरी समाजाच्या शोषणाविरुध्द कार्य करणारे जे थोडेच समाजसुधारक व विचारवंत होऊन गेले. त्यापैकी कै. कृष्णराव भालेकर हे होते. लोक अज्ञानामुळे दिशाहीन झाले आहेत. व त्यांच्या अज्ञानाचा फायदा भट, ब्राम्हणांच्या निर्वाहाचे तारु चालले आहे. अशी त्यांची खात्री झाली. तत्कालीन समाजात खरे काय? खोटे काय कोण कोणाला फसवीत आहे व कोण फसला जात आहे हे भालेकरांनी प्रत्यक्ष पाहिले. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकात शेतकरी जीवनाचे चित्रण आले होते, म. फुले यांचे अनुयायी कृष्णराव भालेकर यांनी 'बळीबा पाटील' (१८८८) या कादंबरीत ग्रामजीवनाचे थोडेबहुत चित्रण केले. जो शेतकरी कष्टकरी वर्ग फसला जात आहे. ज्याचे शोषण होत आहे. त्यासाठी आपण काही करायला पाहिजे अशी समाजसुधारणा विषयक क्रांतीकारी विचारांची बीजे भालेकरांच्या मनात त्यावेळी अंकुरली. समाजातील अज्ञानी लोकांचे शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करणे दारिद्रय नष्ट करणे आणि दु:ख नाहीसे करणे यासाठी त्यांनी चालविलेले 'दीनमित्र' हे नियतकालीक हा एक महत्त्वाचा उपक्रम होय. या नियतकालिकाचे संपादन स्वत: कृष्णराव भालेकर करीत असत. याशिवाय समाज सुधारणेस आवश्यक असा मजकूरही लिहित असत. याच 'दीनमित्र' मधून त्यांनी एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या काळामध्ये 'बळीबा पाटील' आणि १८५७ चा दुष्काळ या

शीर्षकाखाली लेखन प्रसिध्द केले. श्री. सीताराम रायकर यांनी संपादित केलेल्या कृष्णराव भालेकर समग्र वाड्मयात या लेखनाचाच मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून समावेश केला आहे.

पंचाण्णव वर्षाचा वृध्द बळीबा पाटील हा या कादंबरीचा नायक आहे. निर्व्यसनी व अत्यंत व्यापक विचारांचा हा पाटील आपले गाव, गावातील विविध जाती जमाती आणि धर्माच्या लोकांवर अत्यंत प्रेम करणारा आहे. तो एकदा अशा विविध जाती जमाती आणि धर्माच्या मित्रांची आणि त्यांच्या कुटुंबियांची एक सभा बोलावतो. या सभेत जी एकूण चर्चा होते ती चर्चा म्हणजेच 'बळीबा पाटील' ही कादंबरी होय. शेतकऱ्यांची विविध मोसमांतील ऋतुमानाप्रमाणेच शेतीविषयक कामे त्यांच्या या कामाचे कष्टमयी स्वरुप शेतकऱ्यांचा कसाबसा होणारा उदरनिर्वाह त्यांचे निकृष्ट राहणीमान यांचे दर्शन या कादंबरीतून घडते. गावकामगार पाटील व कुलकर्णी यांचेही चित्रण भालेकरांनी केले आहे. रायकर यांनी बळीबा पाटील ही जरी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी आहे असे म्हटले असले तरी ग्रामीण साहित्याचे एक भाष्यकार डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'पाचोळा' आणि 'दहा समीक्षक' या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत (पृष्ठ १०) संदिग्धता व्यक्त केली आहे. ते म्हणतात, एकंदरीत 'बळीबा पाटील' या कादंबरीच्या प्रारंभीच्या भागातून ग्रामीण वातावरणाचा आणि गावगाडयाचा काहीसा प्रत्यय येतो. याशिवाय या संदर्भात ग्रामीण साहित्य चळवळीचे एक भाष्यकार डॉ. आनंद यादव यांचेही मत विचारात घ्यावे लागेल. 'बळीबा पाटील' सारखी ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरीलेखनाचा एक प्रयत्न आहे.

या कालखंडातील आणखी एक महत्त्वाच्या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. विसाव्या शतकाच्या प्रारंभी 'धनुर्धारी' (रा.वि.टिकेकर) यांनी 'पिराजी पाटील' (१९०३) ही ग्रामीण जीवनविषयक कादंबरी लिहून नवी वाट

चोखाळली. पहिली यशस्वी ग्रामीण कादंबरी म्हणून धनुर्धारींच्या उपरोल्लेखित 'पिराजी पाटील' या कादंबरीचा विचार करावा लागतो. धनुर्धारींनी भीषण दुष्काळ या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची झालेली उपासमार, पांढरपेशी वर्गाची मक्तेदारी बेजबाबदार शासनाबद्दलची चीड 'पिराजी पाटील' या कादंबरीतून व्यक्त केलेली दिसून येते. शेतकऱ्यांना दुष्काळात पांढरपेशांनी कसे लाथाडले. लुटालुट, लाचखोरी या साऱ्यांचे चित्रण कादंबरीत आले आहे. धनुर्धारींना ग्राम व्यवस्थेचे नेमके आकलन असल्याने संपूर्ण ग्रामजीवन अतिशय सूक्ष्मतेने प्रकट केले आहे. कादंबरीची भाषा अगदी रोखठोक तशीच साधी सोपी आहे.

कुसुमावती देशपांडे यांनी कादंबरीचे अचूक मूल्य ओळखून 'पिराजी पाटील' विषयी लिहितात 'पिराजी पाटील' ही ग्रामजीवन विषयक कादंबरी अधिक मौलिक व वस्तुनिष्ठ आहे. या कादंबरीविषयी समीक्षकांनी विविध मते नोंदविली आहेत ती अशी—

आनंद यादव:—

''पांढरपेशा ब्राम्हणी जीवनाच्या कक्षेबाहेर जाऊन मराठी वास्तवजीवन पाहणारा या काळातला एकच एक कादंबरीकार म्हणून धनुर्धारीचे महत्त्व विशेष वाटते''[३९]

रवींद्र ठाकूर:—

'पिराजी पाटील' ही ग्रामीण वास्तवाचा तलस्पर्शी वेध घेणारी वाचकाला विचार प्रवृत्त करणारी कादंबरी आहे.''[४०]

नागनाथ कोत्तापल्ले :—

''ग्रामीण जीवनाचे वास्तव सूक्ष्मतेने प्रकट करु पाहणारी ही यशस्वी कादंबरी आहे असे म्हणता येईल.''[४१]

'बळीबा पाटील' आणि 'पिराजी पाटील' या दोनच कादंबऱ्यांनी हा कालखंड ओळखला जातो. या दोन्हीही कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीची बीजे रोवली असे म्हणावयास हरकत नाही.

## ग्रामीण कादंबरीचे दुसरे पर्व (१९२० —१९६०):—

१९२०—१९६० या कालखंडात ग्रामीण कादंबरीचे दोन टप्पे पडलेले दिसून येतात. स्वातंत्रपूर्व कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड या दोन टप्प्यात ग्रामीण कादंबरीचा विकास होत गेला. या कालखंडात ग्रामीण कादंबरीने एक पायंडा घातलेला दिसून येतो. नवी दिशा नवे मान राखून कादंबरी निर्माण झाली आहे.

## स्वातंत्रपूर्व कालखंड (१९२० ते १९४५):—

१९२०च्या पूर्वीचा कालखंड म्हणजे आधुनिक वाङ्मयाच्या निर्मिती प्रारंभाचाच कालखंड होता. १९२० च्या नंतरचा काळ हा अनेकार्थाने महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये राजकीय आणि सामाजिक स्वरुपाची उलथापालथ सुरु झाली होती. परिवर्तनाच्या दिशा उजळू लागल्या होत्या. टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीपर्वाचा प्रारंभ झाला. म.गांधीच्या रुपाने राजकीय क्षेत्रात एका नव्या नेतृत्वाचा उदय झाला होता. खरा भारत खेडयांतच आहे. म्हणून खेडयांचा उध्दार झाला पाहिजे यासाठी 'खेडयाकडे चला' या त्याच्या घोषणेमुळे सारा समाज भारावून गेला. शाहू महाराज, भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खेडयापाडयांतील सामान्य, बहुजन समाजातील आणि मर्यादित स्वरुपात तळागाळातील समाजातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. त्यातून शिक्षणाचा काही प्रमाणात का होईना खेडयापाडयापर्यंत प्रसार होण्यास मदत झाली.

१९२० नंतरचे पहिले ग्रामीण जीवन चित्रण करणारे कादंबरीकार म्हणून ना.वि. कुलकर्णी यांचा उल्लेख करावा लागेल. कुलकर्ण्यांनी ग्रामीण

जीवनानुभवाच्या वेगवेगळया वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला आहे. 'मजूर' या त्यांच्या पहिल्या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या जीवनाची झालेली परवड चित्रित केली आहे. याशिवाय 'दिवस कसे जातील' (१९२५) 'पैसा'(१९२६), वि.स. सुखटणकरांनी 'सहयाद्रीच्या पायथ्याशी'(१९३१) या कथासंग्रहाद्वारे गोमंतकीय प्रादेशिक जीवनाचा परिचय घडवला होता. " जे धाडस कोल्हटकर, गडकरी, वा.म.जोशी, फडके यांनी केले नाही. ते ना.वि कुलकर्णी यांनी करुन 'नवी दिशा' दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.''[४२]

१९२० नंतर साहित्यात अनेक वाद निर्माण झाले. गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, मानवतावाद या साऱ्या वादांचा प्रभाव ग्रामीण कादंबरीवरही पडलेला दिसून येतो. वि.वा.हडप अन्नदाता उपाशी (१९३१), वि.स.खांडेकरांच्या कांचनमृग (१९३१) या कादंबरीत ग्रामजीवनाचे काही प्रमाणात चित्रण आहे. कांचनमृग (१९३१), उल्का (१९३४) दोन ध्रुव (१९३५) या साऱ्या कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटलेले आहे. या कादंबऱ्यांवर मार्क्सवाद, गांधीवादाचा प्रभाव दिसून येतो.

१९४० पर्यंतची कादंबरी ही गांधीवादी, मार्क्सवाद यांच्या प्रभावातून निर्माण झालेली दिसून येते. वास्तववादी कादंबरीचा हा एक नवा अविष्कार होता. या अविष्कारातून अस्सल ग्रामीण जीवनचित्रण करणारे लेखक उदयास आले. ग्रामीण कादंबरीला मातीचा गंध प्राप्त करुन दिला. तो र.वा.दिघ्यांच्या 'पाणकळा' (१९३९) 'पाणकळा' विषयी स.गं.मालशे लिहितात. 'पाणकळा' ही ग्रामीणतेचे कातडे पांघरलेले एक पाश्चात्य धर्तीची प्रणय रहस्य कथा आहे. 'सराई' ही दिघ्याची अतिशय लोकप्रिय ठरलेली कादंबरी होय. 'आई आहे शेतात' (१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८) या कादंबऱ्यांतूनही ग्रामीण जीवन चित्रित केले आहे. दिघ्यांच्या कादंबरीने एका नव्या प्रवाहाचा शोध लावला तो म्हणजे 'प्रादेशिकता' 'आज दिघ्यांना 'प्रादेशिक' कादंबऱ्यांचे जनक' ही दिलेली

उपाधी सार्थ ठरते. १९४१ पासून ग्रामीण साहित्याला विशेष अशी भरती आली. 'प्रादेशिक' हा नवा प्रवाह निर्माण झाला होता.

बी.रघुनाथ, वि.द.चिंदरकर, बा.सी.मर्ढेकर, ना.के.महाजन, म.भा.भोसले, ग.त्र्यं. माडखोलकर, वि.ल.बर्वे, न.चिं.केळकर, वि.वि.बोकील, द.र.कवठेकर, रघुवीर सामंत इ. कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरी विश्वात मोलाची भर घातलेली आहे.

या सर्व कादंबरीकारांच्यावर ग्रामवादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. स्वातंत्रपूर्व कालखंड हा ना.वि.कुलकर्णी, र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ, बा.सी.मर्ढेकर या कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीचा बहरीचा काळ म्हणून गाजविला. ग्रामीण कादंबरीला लोकप्रियता आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या काळात प्रादेशिकतेचे नवे परिमाण ग्रामीण कादंबरीला येऊन मिळाले आणि ग्रामीण कादंबरीने साहित्य विश्वात उंच भरारी घेतली.

## स्वातंत्र्योत्तर कालखंड (१९२० —१९४५):—

स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण कादंबरीने नवे भान,संवेदना जाणिवा व्यक्त केल्या आहेत. या काळात ग्रामीण कादंबरीची जडणघडण होऊन काही बाबतीत ती स्थिरावली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कादंबरीवर दिघे, ठोकळ, मर्ढेकर यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. युध्दोत्तर काळात अनेक स्थित्यंतरे घडली. नव्या जाणिवा निर्माण झाल्या. त्यांचे पडसाद साहित्यावर उमटायला फारसा उशीर लागला नाही. बा.सी.मर्ढेकर, शरदचंद्र मुक्तिबोध यांनी कवितेत नवा मानदंड घातला तर गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे, शंकरराव खरात यांनी कथामध्ये बदल घडवून आणला. ही प्रक्रिया कादंबरी वाङ्मयात उशिरा सुरु झाली. असेच म्हणावे लागेल. या काळात कादंबरीत परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय श्री.ना.पेंडसे यांना दयावे लागेल. 'एल्गार' (१९४९) ही कादंबरी प्रकाशित करुन ग्रामीण प्रदेश, निसर्ग जीवनानुभव याचे

चित्रण केले आहे. 'गारंबीचा बापू' (१९५२) ही पेंडशांची अतिशय लोकप्रिय कादंबरी म्हणून उल्लेख करावा लागेल. श्री.ना.पेंडश्यांनी 'हद्दपार'(१९५०) 'हत्या' (१९५४) रथचक्र (१९६२) 'तुंबाडाचे खोत'(१९८७) या ग्रामीण कादंबऱ्या लिहून ग्रामीण कादंबरी वाङ्मयास मोलाचे योगदान दिले आहे. तरीही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल.

श्री.ना.पेंडसे यांच्या समकालीन असणारे गो.नी.दांडेकर या कादंबरीकारानेही ग्रामीण कादंबरी क्षेत्रात भरीव अशी कामगिरी केली आहे. दांडेकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून कोकणातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले. त्यांच्या 'शितू' (१९५३), 'पावनाकाठचा धोंडी' (१९५५), 'बिंदूची कथा' (१९४७), 'तुडवलेलं घरकुल', (१९४८), 'पडघवली' (१९५५), 'पूर्णामायची लेकर' (१९५८) यामधून दांडेकरांनी वऱ्हाडी लोकजीवनाची प्रतीती घडवली आहे. 'माचीवरला बुधा' (१९५८) 'जैत रे जैत मध्ये, (१९६५) मधून ठाकर या आदिवासी जमातीच्या जनजीवनाच्या पार्श्वभूमीवर नाग्या आणि चिंधी यांची प्रेमकथा चित्रित केली. 'रानभुली' (१९७८) 'वाघरु' १९७९ या कादंबऱ्यांतून कोकणातील निसर्गविदर्भातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे.

१९४५ ते १९५० या पाच वर्षात बहुतांशी सर्वच कादंबऱ्या प्रादेशिक म्हणून निर्माण झाल्या असल्याने निखळ असे ग्रामीण जीवन चित्रण करणारी एकही कादंबरी या काळात दिसली नाही.

व्यंकटेश माडगूळकर यांनी कादंबरी क्षेत्रातही स्वतःचा असा एक वेगळा ठसा उमटविलेला आहे. ग्रामीण जीवनाचा अगदी सहजपणे अविष्कार त्यांच्या कादंबरीतून दिसतो. 'पुढचं पाऊल' (१९५०). ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीत एका दलित कलावंताची कथा वर्णन केली आहे. त्यांची 'बनगरवाडी' (१९५५) ही अत्यंत गाजलेली कादंबरी होय. एक प्रादेशिक ग्रामीण कादंबरी

16794
SARR. B... SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

म्हणून 'बनगरवाडी' कडे पाहिले जाते. या कादंबरीतून अस्सल खराखुरा आणि जिवंत अनुभव प्रत्ययास येतो. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे एकात्मिकरण या कादंबरीत चित्रित केले आहे.

या शिवाय 'वावटळ' (१९६४) 'कोवळे दिवस' (१९७९) 'करुणाष्टक' (१९८२) 'सत्तांतर (१९८२) इ. कादंबऱ्यांतून व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कादंबरीचे नवे दालन खुले केले असे म्हणणे युक्त ठरेल.

या काळात आणखी काही ग्रामीण लेखक निर्माण झाले. या लेखकांनी जे प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलं, स्वत: अनुभवलं ज्या निसर्गाच्या सान्निध्यात तो जगला या साऱ्या अनुभवाचे अस्सल चित्रण कादंबऱ्यांतून चित्रित केले आहे. बा.भ.बोरकरांनी गोव्यातील ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर 'भावीण' (१९५०) ही कादंबरी लिहिली. विभावरी शिरुरकरांनी 'बळी' (१९५०) ही कादंबरी लिहिली. ही एका नव्या धर्तीवरची कादंबरी लिहून एक प्रकारची खळबळ माजवली. एकंदरीत या कालखंडाचा विचार करता 'प्रादेशिकतेचे' परिमाण अधिक घट्ट झाले आहे. श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण कादंबरीला प्रादेशिकतेचा स्पर्श दिला. ग्रामीण कादंबरीने ग्रामीण जीवनाकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची नवदृष्टी दिली. या काळात कादंबरीने वास्तवतेकडे अधिक भर दिला.

१९२०–१९६० या चाळीस वर्षात ग्रामीण कादंबरीने नवनव्या वाटा चोखाळल्या. या काळात ग्रामीण कादंबरी बहरास आली. ग्रामीण जीवनातील अनुभव, ग्रामीण संस्कृती, ग्रामीण माणसांची मने या साऱ्या गोष्टींचे घडविलेले दर्शन अवर्णनीय असेच आहे.

## ग्रामीण कादंबरी तिसरे पर्व:— (१९६०)

ग्रामीण साहित्याची पूर्वतयारी अनेक अंगांनी होत होती. पण तिचा एकत्रित परिणाम जाणवला तो १९६० नंतर, स्वातंत्र्यानंतर ग्रामीण समाजाला

त्याचे रास्त स्थान मिळण्याच्या प्रक्रियेला वेग आला. लोकशाही आणि सार्वत्रिक निवडणुका यांनी बहुजन समाजाला आपल्या हक्कांची आणि महत्त्वाची जाणीव निर्माण झाली. १९६० ला संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न अंशत: साकार झाले. आणि महाविदयालये तालुक्यापर्यंत जाऊन पोहोचली.

साधारणत: १९६० नंतर निर्माण झालेली ग्रामीण कादंबरी अधिक जोमदारपणे उभी राहिली आहे. ग्रामीण वास्तवाचे भान आलेले त्याचबरोबर कलात्मक अभिव्यक्तीचे नवे आदर्श ही निर्माण झाले. व्यंकटेश माडगूळकरांनंतर महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून उद्धव शेळके यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या 'धग' (१९६०) या पहिल्याच ग्रामीण कादंबरीने एक मैलाचा दगड गाठला. 'धग' ही कठोर वास्तवाचे कलात्मक रुप अविष्कृत करणारी मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. कौतिक या शिंपी कुटुंबातल्या सामान्य स्त्रीने जगण्यासाठी केलेल्या धडपडीची ही कथा आहे. जगण्याच्या प्राथमिक प्रश्नाने तिचे आणि तिच्या कुटुंबाचे जीवन एवढे ग्रासून टाकले आहे की, शेवटपर्यंत त्यातून ती बाहेर पडू शकली नाही. परिस्थितीविरुध्द ती एकाकीपणे झुंजत राहिली आणि शेवटी पराभूत झाली. 'धग' मधील ग्रामीण अनुभवविश्वाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे या कादंबरीची भाषा प्रमाण भाषेतून लेखकाने निवेदन केले आहे. साध्या सरळ निवेदनातून आणि आवश्यक असेल तेथे संवादातून ही कथा आकार घेत जाते. एके दिवशी कौतिक म्हणते,

**" अस्सं —बुढा मयनाभर नाई आला तं!"**

**" आजच तू उपासी राहून रायली का?"**

**"नाई ताहान लागल्यावर खांदजा अड......"**[४३]

या संवादातून कौतिक आणि महादेव यांच्या स्वभावावर चांगलाच प्रकाश पडतो.

''धग'' ही संपूर्ण भारतीय ग्रामीण जीवनाचा आकांत साक्षात करणारी शोकांतिका आहे. असे स. त्र्यं. कुल्ली यांनी म्हटले आहे. १९६० नंतर जो ग्रामीण लेखक वर्ग उदयास आला. तो विविध स्तरातून आला असल्याने या लेखकांनी आपल्या ग्रामीण परिसरातील प्रत्यक्ष आलेले अनुभव कादंबरीबद्ध केले आहेत. या ग्रामीण कादंबऱ्या प्रामुख्याने खेडेगावातील शेती व्यवसाय, कष्टकरी, भटके, विमुक्त आणि दलित यांच्या व्यथावेदना,संवेदना ग्रामीण कादंबरीत शब्दबद्ध केल्या आहेत. म्हणूनच १९६० नंतरची ग्रामीण कादंबरी अधिक यशस्वी झालेली दिसून येते.

रणजित देसाई यांनी आपल्या लेखनाची सुरुवात ग्रामीण कथा—कादंबरीने केली आहे. हे आवर्जून सांगावे लागावे अशी आज परिस्थिती आहे. 'बारी' (१९५९) गुन्हेगार मानल्या गेलेल्या बेरड जमातीच्या जीवनाचे चित्रण करणारी आहे. शंकर पाटील यांनी 'टारफुला' (१९६४) मधून ग्रामीण भागातील तीन पिढयांचा संघर्ष चित्रित केला आहे. याशिवाय आणखी काही ग्रामीण कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीत मोलाची भर घातली आहे.

हमीद दलवाईनी 'इंधन' (१९६५) ही कृतिशील सामाजिक कार्यकर्त्याने लिहिलेली विचारप्रेरक कादंबरी म्हणावी लागेल. १९७० नंतर मराठी कादंबरी विश्वात अंतर्बाहय बदल घडून आले. रा. रं. बोराडे आणि आनंद यादव यांच्या ग्रामीण कादंबऱ्यांनी एक लक्षणीय टप्पा गाठला आहे. असे म्हटले तरी योग्य ठरेल.

रा. रं. बोराडे यांची 'पाचोळा' (१९७१) ही ग्रामीण बोलीभाषेत लिहिली गेलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे. 'पाचोळा' ही मराठवाडयातल्या एका खेडयातील गंगाराम आणि पारबती या शिंपी कुटुंबाची शोकांत कहाणी आहे. या कादंबरीविषयी शांता शेळके लिहितात, ''तिचे सौंदर्य व सामर्थ्य तिच्या अकृत्रिम साधेपणात आणि कलात्मक सच्चेपणात आहे.''[४४]

बोराडयांनी आणखी काही कादंबऱ्या निर्माण करुन ग्रामीण कादंबरीच्या विकासास हातभार लावला आहे. 'सावट'(१९८७) मधून उच्च शिक्षणामुळे निर्माण झालेले प्रश्न मांडलेले आहेत. 'चारापाणी'(१९७९) तून मराठवाडयातल्या दुष्काळी परिस्थितीचे चित्रण केले आहे. रा.रं.बोराडे यांच्या समकालीन असलेल्या आनंद यादव यांनी 'गोतावळा' (१९७१) ही ग्रामीण कादंबरी निर्माण करुन ग्रामीण कादंबरीला एक प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. कोल्हापूर –कागल परिसरातल्या एका खेडेगावात सालगडी म्हणून शेतकाम करणाऱ्या नारबाची ही आत्मकथा आहे. नारबाने निर्माण केलेले हे विश्व उपयोगितावादी यंत्र संस्कृतीच्या आगमनामुळे क्रमाक्रमाने उध्दवस्त होत जाते. शेतीविषयी असणारी श्रध्दा प्रेम आणि नवी दृष्टी यांच्या संघर्षात डळमळणारे ग्रामीण भावविश्व नारबाच्या रुपाने व्यक्त होते.

याशिवाय 'नटरंग' (१९८०), 'एकलकोंडा' अशा काही प्रयोगात्मक कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत. १९८० नंतरच्या दशकात 'झोंबी' (१९९०) 'नांगरणी' 'काचवेल' 'घरभिंती' (१९९२) या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांतून ग्रामीण कुटुंबाचा जीवनपट चित्रित करुन ग्रामीण कादंबरीच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. १९८० नंतर यादवांचे लेखन बदलून गेले. ना.धो महानोरांनी 'गांधारी' (१९७३) तून स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण जीवनातील समस्या ताणतणाव यांचे चित्रण केले आहे. काही लेखकांनी ग्रामीण कादंबऱ्या निर्माण केल्या. परंतु 'ग्रामीण लेखक' ही उपाधी त्यांना लावली नाही. तरीही त्यांनी ग्रामीण कादंबऱ्या विकासास हातभार लावला आहे 'शंकर पाटील' 'सरपंच' (१९६९), ग.दि.माडगूळकर 'आकाशाची फळे' (१९६०), महादेव मोरे 'पाव्हणा' (१९६६) 'मी आणि माझा बाप (१९६९), चंद्रकुमार नलगे 'आगीनफुल' (१९७४) अशा अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी ग्रामीण कादंबरीचे क्षितीज विस्तारण्यासाठी महत्त्वाचे असे योगदान दिले आहे. १९७० नंतर ग्रामीण भागात नवनवे प्रश्न निर्माण होऊन त्यांचे तीव्र पडसाद समाजामध्ये

उमटू लागले. ग्रामीणांच्या दु:खाला वाचा फोडणारी नवी पिढी शेतकरी कुटुंबातून उदयास आली. ग्रामीणांची दु:खे कादंबरीत शब्दांकित होऊ लागली. १९६० –१९७५ या काळातील कादंबरी संमिश्र स्वरुपाची आहे.

## १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी:–

१९७५ च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरु झाली. दलित साहित्यापाठोपाठ झालेला हा आणखी एक सांस्कृतिक उद्रेक होता. ज्या सामाजिक अपरिहार्यतेतून दलित साहित्य चळवळीचा उदय झाला तीच सामाजिक परिस्थिती ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य या चळवळींना कारणीभूत ठरली. स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण बहुजन समाजात सांस्कृतिक चलनवलनास प्रारंभ झालेला होता. परिवर्तनवादी चळवळी गतिमान झालेल्या या काळात ग्रामीण साहित्यानेही आपली भूमिका स्पष्ट केली. आणि येथेच ग्रामीण साहित्य चळवळ सुरु झाली.

ग्रामीण कादंबरीचा हा प्रवाह पुढे वाहता ठेवण्यासाठी महत्त्वाचे कार्य अनेक कादंबरीकारांनी केले आहे. त्यामध्ये पुरुषोत्तम बोरकर, आनंद पाटील, अशोक व्हटकर, नागनाथ कोत्तापल्ले, राजन गवस, वासुदेव मुलाटे, विश्वास पाटील, मोहन पाटील, सदानंद देशमुख इत्यादीचा उल्लेख करता येईल. आनंद पाटील 'कागूद' आणि 'सावली' (१९८६) पुरुषोत्तम बोरकर 'मेन इन इंडिया' (१९८७) बाबाराव मुसळे, 'हाल्या हाल्या दुधू दे' (१९८५) अशोक व्हटकर, 'बगाड' (१९८४) नागनाथ कोत्तापल्ले, 'उलट चालिला प्रवाहो' (१९८५) आणि 'गांधारीचे डोळे' (१९८५) वासुदेव मुलाटे, विषवृक्षाच्या मुळया (१९८९), राजन गवस, 'चौंडक' (१९८५), विश्वास पाटील 'झाडाझडती' रामचंद्र पाठारे 'पाचर'(१९८९) बंडु तुपे 'झुलवा' (१९८६) ह.मो.मराठे, 'देवाची घंटा' (१९८७) रवींद्र शोभणे 'प्रवाह' (१९८३) मोहन पाटील 'लिगाड आणि खांदेपालट' (१९९०) इत्यादी कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील ताण तणाव स्थित्यंतरे प्रकट केली आहेत.

याशिवाय आणखी काही कादंबरीकारांनी ग्रामीण जीवनाचे विविधांगी दर्शन घडविले, बाबा भांड, जरंगा (१९७८) 'काजोळ' (१९८४), नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळा' विजय सिरसाट 'काळगर्भ', रंगनाथ पठारे 'ताम्रपट' रंगराव पाटील 'दंश' (१९८७), व बा.बोधे 'जंगल', सुरेश शिंगटे 'कालवा' इत्यादी कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथार्थपणे दर्शन घडविले आहे.

ग्रामीण कादंबरीला आकार देण्याचे मोलाचे कार्य वरील सर्व लेखकांनी केले. आजची ग्रामीण कादंबरी केवळ ग्रामीण जीवन चित्रण रेखाटत नाही. तर जीवनात येणाऱ्या समस्या, दु:ख यामागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. असाच प्रयत्न आजचे उल्लेखनीय कामगिरी करणारे लेखक श्री. 'मोहन पाटील' यांनी केला आहे. श्री. मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीतून आजकाल गावपातळीवर कशा प्रकारचं राजकारण सुरु आहे. विकास विषयक योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थींना मिळण्याऐवजी धनदांडग्यांनाच कसा मिळत आहे. या धनदांडग्याच्या हाती सत्ता कशी एकवटली आहे. याच्यासाठी 'खांदेपालट' आवश्यक आहे. तसेच या कादंबरीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा—कथा 'साखर—प्रश्नाचा गुंता' त्यातच घडणारे सरधोपट सहकारमार्गी राजकारण त्याच्या बदलासाठी अपरिहार्यपणे येऊ घातलेली नवी विवेकशीलता सच्च्या ग्रामीण संवेदनशीलतेने कथात्म रुपात उलगडताना दिसते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची आगतिकता मांडताना त्यांच्यातील वृत्तीजागर मोहन पाटील यांनी अनेक वर्तमान संदर्भासह आणि भव्य अवकाशासह टिपताना दिसतात. ग्रामीण कादंबरीने ग्रामीण वास्तवाशी एक जवळीकतेचे नाते निर्माण केले आहे. असे म्हणावे लागेल.

आजच्या ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा सखोल अभ्यास करुन तिचे वेगळेपण दाखविले आहे आणि एक नवे परिमाण प्राप्त करुन दिले आहे. या संदर्भात रवींद्र ठाकूर लिहितात, ''मराठी ग्रामीण कादंबरीने

' कादंबरी' या साहित्य प्रकाराच्या प्रकृतीचे भान अगदी सुरुवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य ही एक सामाजिक घटना आहे. कादंबरी हा समकालीन समाज वास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे. याचे भान ग्रामीण कादंबरीने दाखविले आहे.''[४५]

वरील सर्व विवेचनावरुन कादंबरीची काही वैशिष्टये नोंदविता येतील.

१. ग्रामीण कादंबरीची मुहूर्तमेढ महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाने रोवली.

२. १८७४ ते १९२० या कालखंडात 'बळीबा पाटील' (१८८८) आणि पिराजी पाटील (१९०३) या दोनच ग्रामीण कादंबऱ्या निर्माण झाल्या.

३. १९२० ते १९४० या कालखंडातील कादंबऱ्यांवर मार्क्सवाद, गांधीवादाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

४. १९४० नंतरच्या कादंबरीने प्रादेशिकतेचे रुप धारण केले.

५. र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ यांच्या कादंबरीने ग्रामीण जीवनानुभवाची नवी वाट चोखाळली. त्याच्या 'पाणकळा' ने मराठी माणसाला मातीचा गंध दिला.

६. १९४५ नंतरच्या ग्रामीण कादंबरीला श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर यांनी बहर आणला.

७. १९६० नंतरची ग्रामीण कादंबरी अंतर्बाहय बदलली. प्रदेशानुसार भाषाशैलीची विविध रुपे ग्रामीण कादंबरीत अवतरु लागली. उदा. आनंद यादवांच्या कादंबरीत कोल्हापूर, कागल मधली भाषा तर उध्दव शेळके यांच्या कादंबरीत वैदर्भीय भाषा.

८. १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी स्वतंत्र विचाराने निर्माण झालेली दिसते. ग्रामीण जीवनातील आलेले अनुभव लेखकांनी ग्रामीण कादंबरीत मांडल्याने

ती अधिक अंतर्मुख झाली आहे. १९७५ च्या आसपास तरुण ग्रामीण साहित्यिकांची तिसरी पिढी हळूहळू उदयाला येत होती. आजच्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची कथा—व्यथा टिपण्याचा एक यशस्वी प्रयत्न प्रा.मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीतून केलेला दिसतो.

१९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीची चिकित्सा मांडताना डॉ. र. बा. मंचरकर यांनी काही महत्त्वाच्या नोंदी केलेल्या आहेत.

१. आजच्या ग्रामीण कादंबरीकडे पाहताना सामाजिक आणि वाङ्मयीन कारणांनीही १९८० हे वर्ष एक टप्पा म्हणून जाणवतो.

२. या कालखंडातील लेखक कथाकार म्हणून उदयास येण्यापेक्षा कादंबरीकार म्हणूनच उदयास आले.

३. ग्रामीण स्थित्यंतराशी निगडित असेच विषय या काळातील ग्रामीण कादंबरीकारांनी हाताळले.

## सारांश:—

ग्रामीण कादंबरीच्या उदयापासून आजपर्यंतची ग्रामीण कादंबरी ही विविध टप्प्या—टप्प्यातून विकसित झाली आहे. बदलत्या काळाबरोबर बदलते खेडे, तेथील जीवन या सर्वांचा अभ्यास करुन अनेक ग्रामीण लेखकांनी ग्रामीण कादंबरीचे दालन समृध्द केले आहे. ग्रामीण कादंबरी संख्येने वाढली तशी गुणात्मकतेनेही वाढली. आजही तिच्यात नावीन्य जाणवते. हे मात्र खरे. ग्रामीण वास्तवाची व्यामिश्रता टिपण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकांनी केलेला दिसतो.

## —: संदर्भ ग्रंथ :—


०१. रा.ग.जाधव : मराठी विश्वकोष खंड—३, पृष्ठ ५९९.

०२. क्लारा रीव्ह : साहित्य सिध्दांत, उनि, पृष्ठ २९८.

०३. प्र.वा.बापट/ना.वा.गोडबोले: मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास, उनि, पृष्ठ २००.

०४. तत्रैव पृष्ठ ३३.

०५. भालचंद्र नेमाडे :टीका स्वयंवर, उनि, पृष्ठ १९६.

०६. रा.श्री.जोग: मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ भाग १, पूनर्मुद्रण १९९० महाराष्ट्र साहित्यपरिषद, टिळकरस्ता, पुणे ३०, पृष्ठ ४११.

०७. कुसुमावती देशपांडे :उनि, पृ.१६.

०८. रवींद्र ठाकूर:मराठी ग्रामीण कादंबरी, प्रकाशक, सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिकेशन हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९३, पृ.११.

०९. तत्रैव.

१०. उषा हस्तक साहित्य : अध्यापन आणि प्रकार संपादक श्री.पु.भागवत, मौज आणि पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८७, पृ २५३,२५४.

११. प्रा.गंगाधर गाडगीळ: साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ २०७.

१२. Charles Morgaon Dailogue In Novels And Plays P. 1.

१३. उषा हस्तक: मराठी कादंबरीतील संवाद, 'सत्यकथा' नोव्हेंबर १९६३, पृ२६.

१४. Scott Sir Walter: Theory of literature,(Rene wellek and Austin warren) I bid, page 218.

१५. The Rice of the Novel studies in Defor Richards on and fielding chatto and windus London, 1960. P-10.

१६. William little –The Shorter oxford English Dictionary P-1341.

१७. Earnest A. Baker, History of the English Novel : VolI-P.5.

१८. Katherine Lever, The Novel and the Reader P 16.

१९. ना.सी फडके: मराठी कादंबरोची वाटचाल, परिसंवाद, पुणे.

२०. तत्रैव: पृ. क्र. ३७.

२१. मोचनगड, रा.भी. गुंजीकर : व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती चौथी, १९६५, पृष्ठ १३५.

२२. प्रा.श्री. मा.कुलकर्णी : कादंबरीची रचना, उन्मेष प्रकाशन, नागपूर, आवृत्ती पहिली, १९५६, पृ.१५.

२३. संत प्रा. जान्हवी: कादंबरी एक वाड्मय प्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर २, प्रथम आवृत्ती, १९७१, पृ. क्र.९.

२४. रा.ग.जाधव :मराठी विश्वकोष खंड—३ संपादक, लक्ष्मणशास्त्री जोशी, म.रा.सा.सं.मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली, पृ. ६००.

२५. स.गं.मालसे: साहित्य सिध्दांत 'थिअरी ऑफ लिटरेचर' चा अनुवाद साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८२, पृ.२३४.

२६. श्री.ना.पेंडसे: एक मुक्त संवाद: उदयाच्या कादंबरीकाराशी मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९३, पृ.७.

२७. तत्रैव पृ.क्र. १४.

२८. यु.म.पठाण :मराठवाडयातील लोककथा, प्रस्तावना पृ. ९ ते १७.

२९. श्री. सावतामाळी: सकल संथगाथा. पृ. १८.

३०. नागनाथ कोत्तापल्ले : ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, प्रकाशक—अनिल कुमार मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, धनश्री अपार्टमेंटस १२९६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

३१. प्रा. बापट गोडबोले : मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हिनस प्रकाशन पुणे, तिसरी आवृत्ती, १९९३, पृ.२२४.

३२. त्रि.ना.अत्रे: गावगाडा पृ १—२.

३३. मधु कुलकर्णी : महाराष्ट्र साहित्यपत्रिका ग्रामीण साहित्यविशेषांक महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, जुलै — डिसेंबर १९८०, पृ.४५.

३४. नागनाथ कोत्तापल्ले : उनि पृ.७.

३५. श्री.भालचंद्र नेमाडे : उनि पृ.

३६. डॉ.आनंद यादव: उनि पृ.६.

३७. डॉ.आनंद यादव: मराठा साहित्य समाज आणि संस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १८८५, पृ. १२६.

३८. तत्रैव.

३९. तत्रैव.

४०. रवींद्र ठाकूर : मराठी ग्रामीण कादंबरी, प्रकाशक सुनिल अनिल मेहता, मेहता पब्लिकेशन हाऊस, उनि पृ. २६.

४१. नागनाथ कोत्तापल्ले :उनि पृ.११७—११८.

४२. स.गं.मालशे: आवडनिवड. सुपर्ण प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी, १९७०, पृ १५१.

४३. डॉ.रवींद्र ठाकूर: मराठी ग्रामीण कादंबरी, पृष्ठ क्र. १३०.

४४. शांता शेळके:ललित, जून १९७२.

४५. रवींद्र ठाकूर :उनि पृ. ८.